
# माणूस

१२ जून १९७०
चाळीस पैसे



कोकण मुळातच डोंगराळ व खडकाळ.

त्यातला मार्ग तरी सोपा कसा असेल ?

चंद्रशेखर आझाद

सुखदेव

राजगुरू

भगतसिंग

......... 

हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन आर्मीचे

धुरंधर सेनापती आणि सैनिक

यांच्या हौतात्म्याची वीरगाथा

# अग्निपुत्र

लेखक : वसंत पोतदार

'माणूस' मधून सादर झालेली लेखमाला लवकरच पुस्तकरूपाने प्रकाशित होत आहे.

अधिक तपशील पुढील अंकी.

१३ जून १९७०

# माणूस

| | | |
|---|---|---|
| वर्ष : दहावे | संपादक | सहाय्यक |
| अंक : दोन | श्री. ग. माजगावकर | दिलीप माजगावकर |
| | | सौ. निर्मला पुरंदरे |

| | | |
|---|---|---|
| किंमत | वार्षिक वर्गणी | परदेशची वर्गणी |
| चाळीस पैसे | वीस रुपये | चाळीस रुपये |


## सप्रेम नमस्कार..

गेल्या काही वर्षांपासून मी आपल्या 'माणूस'चा नियमित वाचक आहे. ह्या वेळचा माणूसचा अंक अतिशय वाचनीय तर आहेच, सर्वांना आवडण्यासारखा आहे. पूर्वी 'दिल्ली दरबार' म्हणून श्री. सदाशिव पेठकर हे सदर लिहीत असत, परंतु आता ते बंद का झाले ते समजत नाही. ते सदर परत सुरू व्हावे अशी मनापासून इच्छा आहे.

ह्या वेळच्या माणूसमध्ये श्री. सु. ल. सोमण यांचा 'लोकसभेतील जातीय दंगली!' हा लेख वाचला, परंतु तो थोडासा मनाला खटकला. लोकसभेत पंत-प्रधान श्रीमती इंदिरा गांधी व श्री. अटलबिहारी वाजपेयी यांच्या झालेल्या खडा-जंगीचे पुन्हा एकदा वर्णन वाचावयास मिळाले. त्याचबरोबर त्यांनी त्यामध्ये 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघा'विषयीपण बरेच काही लिहिले आहे. त्यात त्यांनी संघावर बरेच खोटे आरोप करून संघाविषयी लोकांच्या मनात संदेह निर्माण होईल असे वातावरण निर्माण करण्याचा एक प्रयत्न केला आहे. परंतु त्यांनी

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

केलेल्या आरोपाना, वादग्रस्त मुद्दे वगळून थोडक्यात उत्तरे देतो. म्हणजे त्यांचीही सघाविषयी योग्य कल्पना तयार होईल अशी अपेक्षा आहे.

त्यानी सघावर पुढीलप्रमाणे आरोप केले आहेत.

१ : राष्ट्रीय स्वयसेवक संघ आज तरी अर्धमेल्या अवस्थेत आहे.

२ : संघाच्या अवस्थेला सघच कारणीभूत आहे.

३ : महाराष्ट्रात संघाला स्थान नाही.

४ : महाराष्ट्रात सघाची व्याप्ती मूठभर समाजात असून त्याबाहेर सघाला कोणी विचारीत नाही. तसेच तो त्या ठिकाणी पोहचू इच्छित नाही.

५ : सघाजवळ निश्चित राजकीय व सामाजिक कार्यक्रम नाही.

६ : निरर्थक 'बौद्धीक' आणि सांजशाखा ह्याच्या घोटाळ्यात सापडलेल्या सघात निष्क्रियता पसरली आहे.

७ : राजकीय महत्त्वाकांक्षा नाही.

८ : पीडित 'हिंदू' समाजाबद्दलही निश्चित कार्यक्रम नाही.

ह्या सर्व आरोपाना माझ्या माहितीप्रमाणे उत्तरे देत आहे.

आज अखिल भारतामध्ये जवळ जवळ सर्व राज्यांमध्ये सघ मोठ्या प्रमाणावर आहे व अजून वाढत आहे. अकरा राज्यांमध्ये असलेल्या अधिकृत स्वयसेवकांची सख्या पुढे देत आहे व त्याशिवाय अनधिकृत किती असतील याची गणतीच नाही. ह्यावरून तरी सघ आता अर्धमेल्या अवस्थेत नसून राष्ट्रभक्तीची प्रतिज्ञा करूनच ताठ मानेने उभा आहे, हे स्पष्ट होईल.

| राज्ये | स्वयसेवकांची संख्या |
|---|---|
| १ : महाराष्ट्र | ७३,००० पेक्षा जास्त |
| २ : राजस्थान | ३०,००० जवळ जवळ |
| ३ : मध्यप्रदेश | २९,००० पेक्षा जास्त |
| ४ : वेस्ट बगाल | २०,००० जवळ जवळ |
| ५ : बिहार | १८,००० |
| ६ : दिल्ली | १४,५०० |
| ७ : आंध्र | १३,००० |
| ८ : केरळ | ११,००० |
| ९ : पजाब | ९,००० |
| १० : गुजराथ | ८,६०० |
| ११ : हरीयाना | ६,००० |

दुसऱ्या आरोपात आता काही अर्थच नाही. सघाची अवस्था सोमण याना कशी दिसते हे मला समजत नाही. परंतु सघाची आजची अवस्था चांगल्या प्रकारे असून

त्याच्यासमोर निश्चितपणे कार्यक्रम आहे. निःस्वार्थ सेवा करावी आणि आपला देश सर्व राष्ट्रामध्ये मानाने उभा रहावा ह्यासाठी त्याचा प्रत्येक स्वयसेवक निष्ठेने काम करीत आहे.

तिसरा आरोप म्हणजे महाराष्ट्रात ह्या संघटनेला थारा नाही. ह्याचे उत्तर वरील बोलका आकड्यांवरूनच समजेल.

चौथा आरोप हा एका समाजाबद्दल लोकांच्या मनात संदेह निर्माण करणारा आहे. 'संघा 'मध्ये कुठल्याही जातीचे लोक येतात व ते महाराष्ट्रातपण आहेत.

सघाजवळ निश्चित असा सामाजिक व राजकीय कार्यक्रम आहे. तो सांज· शाखेच्या घोटाळयात पडून न राहता तरुण वर्गात आपल्या भारतीय सस्कृतीचे चित्र उमटवितो. संघामुळे सस्कारक्षम वयात मुलांना एकदा शिस्त लागते, चारित्र्यसंपन्नता वाढीस लागते व सघटनेची आवश्यकता कळत नकळत ठसते. हे तीन फायदे सस्कारक्षम वयात झाले की त्याचा मोठा परिणाम जीवनभर राहतो. दादूमिया याना अशा प्रकारची प्रचिती पंजाब, महाराष्ट्र, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश व राजस्थान ह्या राज्यात आली आहे. सघाची जी बौद्धीके चालतात ती निरर्थक असतात, असे अजून कुठल्याही वार्ताहराने छापले नाही. ज्यानी ज्यांनी म्हणून संघाच्या भरणाऱ्या 'शिबिरांस' भेटी दिल्या त्यांनापण तसे वाटले नाही. शिवाय ज्या स्वयसेवकांनी आत्तापर्यंत बौद्धीक ऐकले आहे त्यानापण असे वाटत नाही.

संघाला आपल्या देशाविषयी प्रेम आहे ह्यामध्ये तिळमात्र शंका नाही. ज्या-वेळेस पाकिस्तान व भारत युद्ध झाले त्यावेळेस स्व. लालबहादूर शास्त्री यानी जे मत प्रकट केले त्यावरून तरी सघाजवळ निश्चितपणे राजकीय कार्यक्रम आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

संघाने सामाजिक कार्य केले आहे. दाखवावयाचे झाल्यास पुढील उदाहरण देता येईल. राष्ट्रीय स्वयसेवक सघाचे सरसंघचालक श्री. गोळवलकर गुरुजीनी आसाम-मध्ये वैष्णव व शैव हिंदूची विश्व हिंदू परिषदेतर्फे एकजूट घडवून आणून जे एकात्म-तेचे महान कार्य केले आहे त्यास तोड नाही. हे राजकीय कार्यपण होऊ शकते. त्याच्या ह्या कार्याबद्दल त्याना 'भारतरत्न' असा किताब द्यावा असे दादूमिया यांनी आपल्या एका लेखात म्हटले आहे.

जून १, १९७० रमेश जोगळेकर, डोंबिवली.

□ □ □




सु. ल. सोमण

# नक्षलवादी !

मध्यंतरीच्या जातीय दंगलींच्या कल्लोळात नक्षलवाद्यांचा प्रश्न थोडासा बाजूला पडल्यासारखा झाला होता. वास्तविक त्याची तीव्रता कमी कधीच नव्हती. बंगालमध्ये मध्यान्ह निवडणुकांनंतर डाव्या आघाडीचं मंत्रिमंडळ अधिकारारूढ झालं तेव्हापासूनच नक्षलवाद्यांचे अत्याचार बंगालभर सुरू झाले. अगदी अलीकडे अजय मुखर्जी सरकार कोसळल्यानंतर राष्ट्रपती राजवटीत तर नक्षलवाद्यांच्या कारवाया अधिकच उग्र बनू लागल्या. पूर्वी खेडी, गावं इत्यादींपर्यंत मर्यादित असलेले नक्षलवाद्याचे अत्याचार आता खुद्द कलकत्त्यात सुरू झाले आहेत. दरोडे, बाँबफेक, जिवंत जाळणे, गोळीबार, लुटालूट आदि दहशतवादी प्रकार बंगालच्या जीवनात आज नित्यमीत होऊ पाहात आहेत. एवढेच नव्हे तर ह्या चळवळीची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत असून, दोन-तीन राज्यं वगळली, तर इतर बहुतेक सर्वत्र ह्या नक्षलवाद्यांचे हातपाय पसरत असलेले दिसत आहेत. अशावेळी ह्या मंडळींविरुद्ध जबरदस्त उपाय केंद्र सरकारनं ह्या पूर्वीच योजायला हवे होते. परंतु दुर्दैवाने सरकार तेवढं धाडस करू शकलं नाही. कदाचित् डाव्या उजव्या कम्युनिस्टांचा रोष ओढवून घेऊन सरकार धोक्यात आणणे सरकारपक्षाला रुचलं नसावं. दोन्ही कम्युनिस्ट पक्षांची सहानुभूती ह्या नक्षलवाद्यांना आहे हे उघड आहे. त्यांच्या वेळोवेळच्या वक्तव्यांनी हे अनेकदा सिद्ध केलं आहे. कम्युनिस्ट विचारसरणीशी जवळीक असणाऱ्या श्री. धवन ह्यांना बंगालचं राज्यपालपद, हीही कदाचित् इंडिकेट कॉंग्रेसला मिळणाऱ्या कम्युनिस्टांच्या पाठिंब्याची किंमत असावी. आणि श्री. धवनही त्यांच्या कृतींनी, वक्तव्यांनी त्यांच्याविरुद्धचे हे आरोपपत्र सिद्ध करण्यास कटिबद्ध झालेले दिसतात !

परंतु आता सरकारला ह्या बाबतीत जाग आल्याचं दिसतं आहे. शासनानं आता नक्षलवाद्यांविरुद्ध आघाडी उघडली आहे. त्याचप्रमाणे सर्व राज्यसरकारांनाही कडक उपाययोजना करण्याच्या सूचना गेल्या आहेत. कम्युनिस्टांच्या सहकार्यासाठी, नक्षलवाद्यांकडे कानाडोळा करण्याची जी किंमत मोजली जात होती, ती वाजवीपेक्षा जास्त असल्याचं शासनाला कदाचित् आतां पटलं असावं किंवा सत्तांध, स्वार्थांध, गलिच्छ राजकारणामुळे जबरदस्त फटका बसलेल्या बंगाल कॉंग्रेसला

आपला सर्वनाश दिसून त्यामुळे तीनं केंद्राकडे कृतीची मागणी केली असावी. किंवा घोषणाबाज राजकारणामुळे घोडं पुढे दामटता येत नाही अशी त्यांची खात्री झाली असावी. काही का असेना, नक्षलवाद्यांच्या चळवळीचा धोका शासनानं ओळखला आहेसं वाटतं आहे. हे उशीरा उचललेलं पाऊल असलं तरी योग्य मार्गानं पडलेलं आहे, नि म्हणूनच अभिनंदनीयही !

नक्षलवाद्यांविरुद्धची ही पोलिसी–लष्करी कारवाई आवश्यक आहे, मात्र पुरेशी नाही. कारण नक्षलवाद्यांची चळवळ ही मार्थेफिरूची चळवळ नाही. त्यांच्या अत्याचारातही एक पद्धत आहे. ह्या चळवळीत अनेक सुशिक्षित, संवेदनाक्षम तरुण स्वतःच्या शांत, सुस्थिर जीवनाचा त्याग करून सामील झाले आहेत. प्रमुख नक्षलवादी चारु मुजुमदार ह्यांच्याकडे फार मोठ्या प्रमाणावर तरुणवर्ग आकर्षित होतो आहे. ही तरुण तुर्क चंद्रशेखर ह्यांची चेतावणी खोटी नाही. ह्या चळवळीचं प्रमुख भांडवल आहे शेतमजूर, आदिवासी. आणि ह्या समाजाच्या हालअपेष्टा, दुःखं ही खरोखरीच भयानक आहेत. स्वातंत्र्यानंतरच्या गल्या बावीस वर्षांत ही दुखे नाहीशी तर नाहीतच, कमीही झालेली नाहीत. काही मोजकी राज्यं वगळता, बहुतेक सर्वत्र हा समाज आजमितीलाही उपेक्षित, अपमानीत जीणं जगतो आहे. अन्य वर्गीयांकडून पिळवटला जातो आहे. आणि सारं, समाजवादाच्या रोजच्या रोज घोषणा होत असुनही जमीन–सुधारणा योजनांचे नियमीत ढोल बडवले जात असूनही त्यांची दुःख आणि बड्यांची, राजकीय पक्षांची उद्दट वागणूक न बघवणाऱ्या संवेदनाक्षम तरुणांची मन म्हणूनच भडकून उठतात. ते शेतमजुरांच्या, राबणाऱ्यांच्या, आदिवासींच्या दुःखाना वाचा फोडतात. त्यांना माणुसकीचे साधे अधिकार मिळवून देण्यासाठी सनदशीर मार्ग उपयोगी पडत नाहीसे दिसल्यावर, ते हिंसेला जवळ करतात. त्यांच्या भडकलेल्या मनाचा, त्यांनी फुलवलेल्या शेतमजूर-आदिवासींच्यातल्या असंतोषाचा फायदा उचलतात कम्युनिस्ट ! त्यांच्या बडखोरीला ते पद्धतशीर खतपाणी पुरवतात. प्रसंगी शस्त्र, पैसा नि माओ–तत्त्वज्ञानाची झिलईही पुरवितात ! पोलिसानी केलेल्या ताज्या मोहिमेतील नक्षलवादी कैदी कु. मार्गारेट (मेरी) टेलर ही ब्रिटिश तरुणी, ब्रिटिश कम्युनिस्ट पक्षाची सभासद असल्याचं जाहीर झालं आहे. तर तिचा प्रियकर (?) दुसरा नक्षलवादी कैदी अमलेन्दु सेन तिला जर्मनीत भेटल्याचं सांगितल जात. ह्याचा अर्थ कदाचित एवढाच असेल, की नक्षलवादी चळवळीला आज आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट चळवळीचही सहकार्य लाभलं असेल म्हणूनच ही चळवळ आज अधिकच धोकादायक बनली आहे, नि केवळ लष्करी सामर्थ्यानं ही चळवळ कायमची दडपली जाणं कठीण आहे.

ह्या चळवळीचा म्हणूनच आज, लष्करी पातळीपेक्षाही अधिक गंभीरपणे वैचारिक पातळीवरच मुकाबला करणे आवश्यक आहे नक्षलवादी चळवळीमागची कारणं शोधून काढून त्यांच्या मुळावर घाव घालणे व त्यामार्गे तरुणाना त्या चळवळीपासून दूर ठेवणे हा खरा उपाय. परंतु सध्याच्या राजकारणाचा विचार

[पृष्ठ ५७ वर]



# धोंडो विठ्ठल देशपांडे

## मराठी बाण्याचा माणूस

'धोंडो विठ्ठल' हे नाव तसे आकर्षक नाही. नुसते हे दोनच शब्द उच्चारले तर बहुधा उपरणे, गलमिशा, पागोटे यांचाच बोध व्हावा. देशपांडे हे आडनाव गुळगुळीत. त्यातून माणसाच्या व्यक्तिमत्त्वाचा थांगपत्ता लागतच नाही. प्रत्यक्ष व्यक्ती दुरून पाहिली तर मुद्रेवरचा उग्रपणा आणि गंभीरपणा पाहून एखाद्याने धसका घेतला तर नवल नाही. या माणसाशी कसली मैत्री होणार अशी रास्त शंका येणे अगदी स्वाभाविक.

धोंडो विठ्ठल तथा नाना देशपांडे यांचे नाव आणि रूप अशा प्रकारचे आहे. पण या माणसाच्या थोडे जवळ गेलात तर वेगळा अनुभव यायला हरकत नाही. खडबडीत फणसाच्या पोटी गोड गरे असावेत तसं नानांचे आहे. त्यांना माणसाबद्दल प्रेम आहे आणि त्याहीपेक्षा आपली ठाम मते त्यांच्यासमोर आग्रहपूर्वक मांडण्याची हौस आहे. मग चर्चा राजकारणाची असो किंवा साहित्याची

द. मा. मिरासदार

असो. राजकारणाचा विषय निघाला म्हणजे चिंतनाने निश्चित केलेली आपली मते स्पष्टपणे नव्हे, – फटकळपणानेसुद्धा – बोलून दाखविण्यास ते मागेपुढे पहात नाहीत. गेल्या वर्षी 'सोबत' साप्ताहिकाचा वर्धापन–दिन पुण्याच्या उद्यान कार्यालयात साजरा झाला. अशा वेळी खरे म्हणजे शुभेच्छा आणि अभिनंदन यापलीकडे न जाण्याचा शिष्टाचार. पण धोंडो विठ्ठल तुकाराम-बुवाचे वंशज. ते म्हणाले, 'हे साप्ताहिक निर्भयता, बाणेदारपणा यासाठी लोकांना आवडते. त्याची रोखठोक वृत्ती अशीच कायम राहणार असेल तर त्याची भरभराट होवो. ही निर्भयता ज्या दिवशी संपेल त्या दिवशीच याची अवतार–समाप्ती व्हावी असे मला मनापासून वाटते.' नाना देशपांडे याच्या फटकळपणाचा यापेक्षा निराळा पुरावा कोणता हवा ? त्या दृष्टीने 'राकट देशा, कणखर देशा' महाराष्ट्राचे ते खरेखुरे प्रतिनिधी आहेत, आपल्या या अस्सल 'म्हऱ्हाठी' बाण्याचा त्यांना अभिमान आहे

पण धोंडो विठ्ठल नुसतेच फटकळ नाहीत. साहित्याचा विषय निघाल्यावर त्यांची गंभीर मुद्रा थोडी कोवळी होते. शब्दात थोडा ओलेपणाही येतो. नाटक, काव्य, कादंबरी-इंग्रजी असो, मराठी असो–नानांना त्यात मनापासून रस आहे. त्याविषयी जिवाभावाने बोलावे एवढी हौस आहे. धोंडो विठ्ठल याचे हे वेगळे दर्शन त्यांच्या मित्रांना नेहमीच सुखवीत असते.

बुद्धिवाद आणि जाज्वल्य राष्ट्रवाद या त्यांच्या मुख्य निष्ठा. या निष्ठातून निर्माण झालेले लेखन 'अश्मसार' या नावाने प्रसिद्ध होत असते. ('अश्म-सार' म्हणजे काय हे या क्षणापर्यंत मला ठाऊक नाही. अश्म म्हणजे दगड एव-ढेच माहीत आहे. त्याचा 'धोंडो' या शब्दाशी काही संबंध आहे की काय ?) हे लेखन वाचकाना भेदक आणि प्रत्ययकारी वाटते. हाती घेतलेले काम प्रामाणिकपणाने व कळकळीने करण्याची त्यांची वृत्ती हेवा करण्या जोगी आहे. शिक्षक–संघटनेचे कार्यकर्ते म्हणून त्यानी पुष्कळ चांगले काम केले. विधान–परिषदेवर शिक्षकांचे प्रतिनिधी म्हणून त्याची निवड करून शिक्षकानी या लढवय्या माणसाचा योग्य गौरव केला. मुंबई विद्यापीठाच्या सीनेटमध्येही त्यानी प्राध्यापकाची बाजू हिरिरीने मांडली.

'धोंडो विठ्ठल' पुन्हा विधान–परिषदेच्या निवडणुकीसाठी शिक्षक मत-दारसंघातून उभे आहेत. दि १४ जूनला ही निवडणूक होईल. त्याच्या यशा-बद्दल पूर्ण खात्री आहे. त्याच्यासारख्या निर्भय, निःस्पृह आणि सचोटी अस-लेल्या माणसाला निवडून द्यायचे नाही तर कोणाला द्यायचे ?

□ □ □



अफसर सगिना महातो आणि त्याची तरुण सेक्रेटरी

सगिना महातो रहातो आसामच्या टेकड्यात; रेल्वेमार्गाच्या बाजूलाच. लहान लहान वयातच आईबापाविना असलेला हा पोर कोणाची तरी पाठ धरून तिथे पोचला. आसामच्या जुन्या ब्रिटिश रेल्वेबरोबरच वाढला. रेल्वे मजूर म्हणून कामाला राहिला. त्या कामकरी जीवनातले दारूचे अत्यावश्यक व्यसन त्याने घेतले पण या जीवनात पदोपदी घडणारे अन्याय गिळण्याची आदत त्याने नाकारली. तो सदा तर्र नाहीतर अन्यायाविरुद्ध उसळता. कसले पाश त्याला खेचत, अडवीत नव्हते, गोऱ्या कातडीचे भय त्याला तिळमात्र भेवडावीत नव्हते. एखाद्या अन्यायाचा तारस्वरात जाब तो गोऱ्या रेल्वे मालकांच्या मॅनेजर नामक काळ्या सूटबूटवाल्या पहारेकरी कुत्र्याला पुढ्यात उभा राहून विचारू शके. सगिना इतरांसारखा एक रेल्वेमजूर होता आणि काही क्षणी तो इतरांच्या दृष्टीतून इतका मोठा होई की जणू आभाळाला भिडे. यामुळे त्याच्यावर या मजुरांचे प्रेम होते.

आणि कम्युनिस्ट पक्षाला या आसामच्या रेल्वेत संघटना बांधण्याची इच्छा होती. जागोजाग त्यांचे कार्यकर्ते पोचत होते. शक्यता अजमावीत होते. माणसे हेरीत होते. निरक्षर, नेक, उसळत्या आत्म्याचा सगिना त्यांना सापडला. त्याला

विजय तेंडुलकर

# सगिना महातो

एक कॉम्रेड म्हणाला, अन्यायाशी झुज दिली पाहिजे, तू आम्हाला मदत कर, या मजुरांना आपण एक करू. एकजुटीच्या हत्यारानेच मालकाशी भांडून आपले हक्क मिळवता येतात. सगिना मनाशी म्हणाला, आम्ही अडाणी माणसे. ही शिकली• सवरलेली डोकेबाज माणसे आमच्यासाठी एवढे करायला येतात तर आम्ही स्वस्थ राहून कसे चालेल. सगिना मजुरांच्या सभा बोलवू लागला आणि कॉम्रेडस या सभातून प्रचार करू लागले.

सगिनाला यातून त्याच्या मजुरांच्या कल्याणापलीकडे काहीच नको होते. तो मागे बसून सभा ऐके. पुढाऱ्याच्या भाषणातल्या नामी युक्तिवादांना टाळ्या देई. घोषणात आपला तारस्वर मिसळून थरारून जाई. परंतु पुढाऱ्यांना सगिना• कडून एवढेच पुरेसे नव्हते. त्याच्याभोवती मजुरांची संघटना त्यांना उभारायची होती. म्हणून भाषणातून ते कॉम्रेड सगिनाची खूप प्रशंसा करीत. आपल्याला मिळालेले हार त्याला बळेबळेच घालीत. त्याच्या नावाचीही एक घोषणा स्वतः उठवीत. कॉम्रेड सगिना महातो झिंदाबाद !

सगिनाला याचे अप्रूप वाटे. गमत वाटे. परंतु यात त्याला कधी त्याचे मोठेपण वाटले नाही. त्याला पुढारी मोठे वाटत. ते त्याच्या लोकांसारखे, त्याच्यासारखे अडाणी नव्हते आणि म्हणून फार मोठे, फार भले होते. सगिना स्वत.ला त्यांच्या पायाची धूळ मानी आणि भक्तिभावाने त्यांच्या सूचना अनुसरे.

पहाता पहाता सगिना महातोभोवती मजुरांची एक सघटना उभी राहिली. मालकांना ती आपल्या हक्कांसंबंधात, त्यांच्या कर्तव्यांसंबधात बजावू लागली. त्याच्या गर्जनांनी आसामच्या टेकड्या घुमू लागल्या. उत्साहाचे, आवेशाचे

वातावरण पसरले. सामान्यातला सामान्य मजूर देखील 'अन्याय सहन करणार नाही' म्हणून आत्मविश्वासाने मूठ वळू लागला.

यातच, एकटा, बिनपाशांचा सगिना महातो खूष होता, त्याला आणखी काही नको होते.

आणि मजुरापैकी एका तरुण बाईवर मॅनेजरची धाड पडली. तिच्यावर बलात्कार घडला. मजूर खवळून उठले. पुढाऱ्यांनी सभा घेऊन त्यांना संपावर नेले. रेल्वेचे काम पूर्णपणे थंडावले. रेल्वेच्या आवाजांऐवजी आसामच्या टेकड्यातून मालक मुर्दाबाद, मॅनेजर मुर्दाबादच्या घोषणा निनादू लागल्या. आजवर जो संताप मुका, वांझ राही त्याला आता वाचा मिळाली, कृती मिळाली.

सगिनाला याचेही छान वाटत होते. मालकांचे दिवस संपून मजुराचे, गरिबांचे दिवस आले असे वाटत होते.

संप यशस्वी ठरला. गोऱ्या मालकाचा गोरा प्रतिनिधी येऊन पोचला. वाटाघाटीना पाचारण आले. पुढारी पुढं झाले. ते बेचाळीस त्रेचाळीस साल. गोरे मालक इतरत्रही तंग होते. इथे त्याना तेढ चिघळणे नको होते. तडजोड ठरली. पुढाऱ्याची अनेकांपैकी एक अट होती: मजुराच्या हितसंबंधांची काळजी वाहण्यासाठी एक मजूर – कल्याण – अधिकारी कंपनीने नेमला पाहिजे. अट मान्यही झाली.

हा मजूर–कल्याण–अधिकारी होण्याची जबाबदारी पुढाऱ्यानी एकमताने टाकली कॉम्रेड सगिना महातोवर. मजूर एक स्वरात ओरडले, कॉम्रेड सगिना झिंदाबाद! सगिना गोंधळला, संकोचला. त्याचा आत्मा उसळून उठला. तो कळवळून, शरमिंधा होऊन पुढाऱ्याना म्हणाला, अरे नाही नाही, मी तर अनपढ, अनाडी माणूस, माझी काय उगीच थट्टा करता? मी कसा अफसर होऊ? मला त्यातले काय कळते? मी मजूर. साधी सही नाही येत, हे डोकेबाज, शिकल्या माणसाचे काम. नाहीच. मी नाही होणार अफसर, तुम्ही कुणी व्हा. तुम्ही हुकूम द्या, मी तो मानतो. एवढीच आमची अक्कल.

पण सगिनाला अफसर करू बघणारे पुढारी काही अनाडी नव्हते. ते डोकेबाज होते. त्यांनी सगिनाची समजूत काढली. त्याला बळेबळेच अफसरच्या खुर्चीत बसवले. त्यासाठी त्याच्या अंगावर सुटाबुटाची अवजारेदेखील चढवली. एक ऑफिस आले. एक बंगली आली. पगाराचे घवघवीत पुडके आले. या निरक्षर अफसरचे काम सांभाळण्यासाठी एक सेक्रेटरी नामक निष्ठावान पक्ष–कार्यकर्ती आली.

पहिल्याच रात्री सगिना महातोने साऱ्या मजुरांना बंगलीवर बोलवून खाण्यापिण्याचा जल्लोष उडवला. दुसऱ्या दिवशी पुढारी त्याला म्हणाले, हे असे यानंतर नाही चालणार. कॉम्रेड सगिना, तुला अफसराच्या तोलामोलाने राहिले पाहिजे. सगिना उसळला. म्हणाला, मी मजूर कल्याण–अधिकारी ना? मजुरासाठी मी आहे ना? मग त्याना टाकून मी एकटा कसा चांगले अन्न खाऊ, उंची दारू पिऊ?

त्यांना त्यांच्या खोपटात सोडून मी या बंगलीत कसा झोपू ? सांगा ! नाही बाबा. हे आपल्याला मेलो तरी नाही जमणार !

पुढारी डोकेबाजच. त्यांनी पुन्हा सगिनाची समजूत पटवली. निरक्षर कॉम्रेड सगिनाची समजूत. त्यांच्या हातचा तो मळ असतो. विशेषतः तरुण सेक्रेटरी कॉम्रेड समजावू लागली की सगिना दुबळा होई.

सारे काम तीच करी. सगिना अंगठा उठवी. काही दिवसातच सगिनाला या निष्क्रिय, बैठ्या, तकलादू, परावलंबी आयुष्याचा पुरता उबग आला. तो म्हणाला, बस्स झाली ही अफसरगिरी. आपण परत मजुरीवर जातो. पण त्याला जाऊ दिले गेले नाही. उलट पक्षकार्याच्या जास्त शिक्षणासाठी कॉम्रेड सगिनाला कलकत्त्यास बोलावण्यात आले. तेथे नेण्यात आले. तेथेच शहरच्या अनोळख्या हवेत थिअरी आणि डायलेक्टिक्सच्या क्लिष्ट जंजाळात त्याला अडकवून त्याचा रांगडा आत्मविश्वास क्रमशः निकालात काढण्यात येऊ लागला. धारदार सुरीने बटाटा सोलावा तसा सगिनाचा अनघड बलदंड आत्मा या वैचारिक शब्द जंजाळाच्या सुरीने अल्लद रोज थोडाथोडा सोलला जाऊ लागला. सगिना पूर्वीचा राहिला नाही. त्याची मनःशांती पार हद्दपार झाली. रांगडी बुद्धी जागोजाग लुळी पडू लागली. तो धड ना मजूर राहिला, धड ना पुढारी बनला. तो झुरत होता—आसामच्या टेकड्यांसाठी, त्यातल्या मजुरीच्या जीवनासाठी, त्यातल्या साध्याबगड्या परिचित माणसांसाठी.

एक दिवशी सगिना याने घुसमटला. पिशवी भरून निघाला. म्हणाला, मी परत चाललो. मला इथे चैन पडत नाही. मी त्या मजुरासाठी अफसर झालो ना ? त्यांच्या-साठी मी आहे ना ? मग मी इथे काय करतो आहे ? तिकडे त्याचे काय चालले असेल ? मी जातो. मी त्यांच्यात जातो.

डोकेबाज पुढाऱ्यांनी समजावण्याचा, रोखण्याचा प्रयत्न केला पण आता सगिना रुकला नाही. त्यानीही त्याला फार निकराने रोखले नाही. त्यांचा बेत पार पडलेला होता. काम झाले होते.

सगिना आसामच्या टेकड्यात पोचला तर मजूर त्याच्याकडे संशयाने, परकेपणाने पाहू लागले. त्यांच्या नजरात त्याला नफरत प्रतीत होऊ लागली. हाक मारावी तो दूरच जाऊ लागला. थुंकू लागला. सगिना गोंधळला, हबकला, मूढ झाला.

हे काय घडले आहे ? असे कसे घडले ?

सगिनाला कळण्याला वेळ लागला. पण पुढारी मंडळीने आपले कार्य तडीस नेलेले होते. आसामच्या टेकड्यात रेल्वे मजुरामध्ये वाढलेल्या कर्तबगार मजूर सगिनाच्या भोवती बांधलेली रेल्वे मजुराची संघटना त्यानी सगिनालाच पद्धतशीरपणे तिच्या-तून हलवून, त्याच्याविषयी संशय, अपसमज, आकसाचा विखार पेरून, आपलीशी केलेली होती. पक्षाच्या दावणीला पक्की बांधली होती. तोच तर त्यांचा मूळ उद्देश.

आणि सगिना महातो मुर्दाबादच्या लढाऊ घोषणा आसामच्या टेकड्यांत उठू लागल्या.

सगिनाच्या अनपढ, नेक, तेज बुद्धीला या डावाचा पत्ता लागला, पण आता उशीर झालेला होता. रांगडा सगिना संपला होता. त्या मातीत रुजलेला सगिना महातो त्या मातीतून उखडला जाऊन उपरा, नकोसा झाला होता. त्याची राजकीय शिकार एका अर्थाने पूर्ण झाली होती आणि पक्षाच्या पदरीं आणखी एक संघटना पडली होती.

या फार फार आगळ्या, मोठ्या ताकदीच्या, स्फोटक, प्रक्षोभक कथेत मिळवा आसामच्या मजुरातली एक तरुण देखणी सायराबानो, काही चांगली गाणी, काही अनावश्यक नाच, आसामच्या टेकड्यांची सदा धूसर आणि कुंद पार्श्वभूमी, आणि मुख्यतः एक हाणामारीचा फिल्मी क्लायमॅक्स — ज्यात तर्कशुद्धपणे शिकारच होणार असलेला सगिना महातो वाचतो आणि पक्षाचा नक्षलवादी वृत्तीचा दुष्ट पुढारी मजुरांहाती कुत्र्यांच्या मौतीने ठार केला जातो. याला एका फ्लॅशबॅकची चौकट टाका. पक्षाने संघटनेतून उखडून टाकूनही ताठ आणि तेज राहिलेल्या सगिनाला पळवून जंगलात आणण्यात आले आहे. त्याच्यावर 'जनता कोर्टा'त खटला चालू आहे. जनता म्हणून पक्षाचे काही मजूर हजर आहेत. या खटल्यात अध्येमध्ये मूळ कथानक उलगडत रहाते. अखेरी अर्थातच महातो जिंकतो. 'जनता' त्याचा जयजयकार करते. वस्तुतः एका उमद्या, रांगड्या, कर्तबगार मजुराच्या राजकीय शिकारीची तर्कशुद्ध शोकांतिका होऊ बघणारी विलक्षण प्रत्ययकारी कथा एकदम ही अशी सुखांतिका कशी काय बनते ? तिच्यात सायराबानो आणि नाचगाणी कशी बसतात ?

हे विचारायचे नाही. काही न विचारता हा 'सगिना महातो' नामक वस्तुतः बंगाली परंतु प्रत्यक्षात बंगाली-हिंदी चित्रपट बघायचा. बघण्यासारखे त्यात खूप आहे. ख्यातनाम बंगाली दिग्दर्शक तपन सिन्हा त्याचे लेखक-दिग्दर्शक-संगीतकार आहेत. दिलीपकुमार या हिंदी चित्रपटांच्या अभिनयनिपुण नायकाची त्यात एक विलक्षण जिवंत भूमिका आहे — जीवनाने रसरसलेल्या रांगड्या, नेक, उसळत्या, पोरक्या, निर्भय, तरुण, सगिना महातो नामक निरक्षर मजुराची. सिन्हा-दिलीप या दोघांनी मिळून या स्फोटक कथेच्या काही जागा खरोखरी संस्मरणीय केल्या आहेत. सरळ सरळ नाट्यमय असलेले प्रसंग बारीक बारीक 'टचेस'नी बहारदार बनविले आहेत.

'अफसर' सगिना सुखवस्तू निष्क्रियतेने उबतो. सेक्रेटरी कॉम्रेड मुलीशी भांडतो. डोक्यात किडे घेऊन, तिरमिरतच रेल्वे लाइनीकडे येतो. आणि माथेरानच्या रेल्वेची आठवण देणाऱ्या झुकझुकत्या आसाम रेल्वेचा लयबद्ध आवाज ऐकून

[ पृष्ठ ५९ वर



समीर

## ▫ भारत–इस्रायल संबंध

भारत सरकारने अरब देशांशी दृढ मैत्री दाखविण्यासाठी इस्रायलशी चालू ठेवलेले निष्कारण वैर ही भारतीय परराष्ट्रीय नीतीतली एक मोठी चूक आहे असे आता अनेक विचारवंत भारतीयांचे मत झाले आहे. इस्रायलमधील एकमेव इंग्रजी दैनिक ‘ जेरुसलेम पोस्ट ’ चे संपादक अरी राथ हे नुकतेच दिल्लीला येऊन गेले तेव्हा त्यांनी या नाजुक विषयावर परखड पण विचारप्रवर्तक मते प्रगट केली. ते म्हणाले :

इस्रायलचा भारतातील पहिला राजदूत कोण होणार हा इस्रायली विदेशमंत्रालयात कित्येक वर्षे एक विनोद झाला होता, पण आता हा विनोद फारसा ऐकू येत नाही. आता त्याचे फारसे कोणाला हसू येत नाही. भारताच्या इस्रायल–विषयक धोरणाने इस्रायली जनतेची घोर निराशा झाली आहे. अरब देशांशी मैत्री असलेले असे पुष्कळ देश आहेत की ज्यांचे इस्रायलशीही चांगले संबंध आहेत. याबाबतीत रुमानियाचे उदाहरण देता येईल. रुमानियाचे इस्रायलशी चांगले व्यापारी संबंध असल्याने अरब देशात रुमानियाचे वजन उलट वाढले आहे. भारताने इस्रायलशी असलेल्या आपल्या संबधात सुधारणा केली तर मध्यपूर्वेची समस्या सोडविण्याच्या बाबतीत भारत महत्त्वाची कामगिरी बजावू शकेल. शिवाय भारताचे आंतरराष्ट्रीय वजनही वाढेल.

इस्रायली राजकारणातील दोन प्रमुख व्यक्ती जनरल मोशे दायान आणि प्रधानमंत्राणी गोल्डा मायर यांच्याबद्दल मत : दाया हे लढाऊ वृत्तीचे आहेत असा सार्वत्रिक समज असला तरी वास्तविक ते अगदी बिनलष्करी वृत्तीचे सेनाधिकारी आहेत. राजकारणात त्यांना महत्त्वाचे स्थान असण्याचे कारण ते कुठल्याही परिस्थितीचे नीट पृथक्करण करू शकतात व ठाम निर्णय घेऊ शकतात. राजकारणी पुरुषात हे दोन गुण क्वचितच सापडतात. सौ. मायर ही एक प्रभावी व्यक्ती आहे. ‘ इस्रायली मंत्रिमंडळातील एकमेव पुरुष ’ असे त्यांचे वर्णन करण्यात आलेले आहे.

## ▫ भारतीय लोकनाट्यात अमेरिकेला रुची

रामलीला, रासलीला, नौटंकी या उत्तर भारतातील पारंपरिक लोकनाट्याचा विशेष अभ्यास करण्यासाठी भारतात आलेले एक अमेरिकन निग्रो नाट्यप्रेमी ब्रायस स्वान यांनी पारंपरिक भारतीय लोकनाट्य व आधुनिकतम अमेरिकन नाट्य यांच्या मागची भावना समान दिसते असे अभ्यासपूर्ण मत परवा दिल्लीत प्रकट केले. देशांतराने व कालांतराने विभागलेल्या या दोन नाट्यप्रकारांचे साधर्म्य दाखविताना ते म्हणाले :

अत्यंत आधुनिक मताच्या अमेरिकन नाट्य-रसिकाला उत्तर हिंदुस्थानातील पारंपरिक नाट्यात बहुधा खूपच स्वारस्य वाटेल. कारण अमेरिकेतील अत्याधुनिक नाट्यकला ज्या नवीन गोष्टी आणू पहात आहे त्या बऱ्याच अंशी भारतीय पारंपरिक नाट्यात सापडतात. उदाहरणार्थ, भारतीय लोकनाट्यात नट आणि प्रेक्षक यांच्यात अगदी जवळचे संबंध असतात; अशा संबंधाला अमेरिकेच्या नवीन 'जिवंत नाट्या'त ('लिव्हिंग थिएटर') फार महत्त्वाचे स्थान आहे. नटाने आपल्या भूमिकेशी तद्रूप होऊ नये हे ब्रेख्तचे तत्त्व आणि आता अमेरिकन नाटकात न सापडणारा नृत्य, संगीत व नाट्य यांचा एकजीव संगम यांना अमेरिकन नवनाट्यात विशेष महत्त्व प्राप्त होऊ लागले आहे, व हे विशेष भारतीय लोकनाट्यात सापडतात. भारताचा आत्मा समजण्यासाठी भारतीय नाट्याचा अभ्यास करणे आवश्यक आहे, कारण या नाट्यात भारतीय समाजाचे या समाजात घडणाऱ्या परिवर्तनाचे चांगले प्रतिबिंब पडलेले पहायला मिळते. भारतीयांना आता आपल्या लोकनाट्याबद्दल पूर्वीपेक्षा बरीच अधिक आस्था वाटू लागली आहे, व ते आता या विषयात बरेच संशोधन करीत आहेत.

स्वान हे निग्रो असल्याने एक अपरिहार्य प्रश्न : 'ब्लॅक पॉवर' बद्दल काय ? उत्तर : 'आम्हाला वेगळे कधीच व्हायचे नव्हते, पण आम्हाला हा मार्ग स्वीकारायला भाग पाडण्यात आले आहे. काळ्या-गोऱ्यांचे एकीकरण ('इंटिग्रेशन') शक्य नाही हे आमच्या लक्षात आले, व अशा परिस्थितीत काळ्यांना आपण एक स्वतंत्र वेगळा समाज आहोत या भावनेची व स्वतःच्या संस्कृतीच्या अभिमानाची जोपासना करणे प्राप्त झाले. आमच्यातील समष्टि-भावना दृढमूल झाल्यावर पुढे कधी काळी अमेरिकन जीवनाच्या मुख्य स्रोतात मिसळणे व 'अमेरिकन स्वप्नां'तला आपला योग्य वाटा घेणे आम्हाला अधिक सुलभ होईल.

▫ ▫ ▫

# सिलोनमधील डाव्यांचा विजय

वा. दा. रानडे

सिलोनमधील सार्वत्रिक निवडणुकीत डाव्यांच्या आघाडीने घवघवीत यश मिळविले असून सिलोनचे राजकारण आता निर्णायकपणे डावीकडे झुकले आहे. पण डावीकडे झुकले याचा अर्थ सिलोन कम्युनिस्ट नियंत्रणाखाली गेला असा करावयाचा काय ? की कम्युनिस्टांच्या सहकार्याने पण कम्युनिस्टांच्या आहारी न जाता पंतप्रधान श्रीमती सिरिमाओ भंडारनायके यांच्या नेतृत्वाखाली सिलोन समाजवादाकडे जाण्याचा स्वतःच्या परिस्थितीस अनुरूप असा मार्ग चोखाळील ? शेजारी देशात डाव्यांकडे सत्ता गेली याचा भारतीय राजकारणावर काही परिणाम होईल काय ? या प्रश्नांच्या संदर्भात सिलोनमधील निवडणुका व तेथील राजकारणातील अंतःप्रवाह समजून घेतले पाहिजेत.

सिलोन प्रतिनिधिगृहाचे एकूण १५७ सभासद असून त्यापैकी १५१ लोकनियुक्त व ६ सरकारनियुक्त असतात. एका उमेदवाराच्या निधनाने एका जागेची निवडणूक पुढे ढकलण्यात आली. बाकी १५० जागांपैकी ११५ जागा डाव्यांच्या आघाडीने मिळविल्या. श्रीमती भंडारनायके यांची श्री लंका फ्रीडम पार्टी, ट्रॉट्स्कीवादी लंका समसमाजपक्ष आणि मॉस्कोवादी कम्युनिस्ट पक्ष या तीन पक्षांची मिळून ही आघाडी बनलेली आहे. निवडणुकीत श्री लंका फ्रीडम पार्टीस ९०, लंका समसमाज पक्षास १९ व कम्युनिस्ट पक्षास ६ जागा मिळाल्या. घटक पक्षांच्या पाठिंब्याशिवायही सरकार स्थापता येईल एवढ्या जागा श्रीमती भंडारनायके यांच्या श्री लंका फ्रीडम पार्टीने मिळविल्या आहेत. पण केवळ स्वतःच्या पक्षाचे सरकार न बनविता त्यांनी आघाडीतील घटकपक्षानाही मंत्रिमंडळात प्रतिनिधित्व दिले आहे. एकूण २१ मंत्र्यांमध्ये लंका समसमाज पक्षाचे तीन व कम्युनिस्ट पक्षाचा एक मंत्री आहे. अर्थखाते एवढेच महत्त्वाचे खाते लंका समसमाज पक्षाचे

नेते डॉ. एन. एम्. परेरा यांना मिळाले असून संरक्षण, परराष्ट्रधोरण व नियोजन ही महत्त्वाची खाती पतप्रधान श्रीमती भडारनायके यांनी स्वत कडे ठेवलीं आहेत. तसेच वीज व पाटबधारे आणि अतर्गत व परराष्ट्र व्यापार ही महत्त्वाची खाती श्रीमती भडारनायके यानी आपल्याच पक्षाच्या मंत्र्यांना दिली आहेत. कम्युनिस्ट मंत्री पीटर केनुमन यांना तर घरबाधणी व बाधकाम या अगदी साध्या खात्यावर समाधान मानावे लागले. यावरून खातेवाटणीत तरी श्रीमती भंडारनायके यांनी कम्युनिस्टाचा पगडा आपल्यावर बसू दिलेला नाही.

## डाव्या आघाडीचे स्वरूप

सत्तेवर येण्यासाठी आघाड्या बनवायच्या आणि एकदा अधिकारावर आल्यावर आपल्या पक्षाचे सामर्थ्य वाढविण्यासाठी आघाड्याचा व सरकारचा उपयोग करायचा हे तत्र कम्युनिस्ट अवलबीत असल्याचा अनुभव डाव्या आघाड्यांबाबत भारतात आलेला आहे. सिलोनमध्ये तसेच होईल काय याचा विचार करताना दोन्ही ठिकाणच्या डाव्या आघाड्यामधील एक महत्त्वाचा फरक लक्षात घेतला पाहिजे. केरळ व पश्चिम बगालमधील डाव्या आघाडीत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष सर्वात मोठा घटक पक्ष होता. सिलोनमधील आघाडीत तसे नाही. तेथे सिरिमाओंची श्री लका फ्रीडम पार्टी हा सर्वात मोठा पक्ष आहे आणि नुसता मोठा पक्षच नव्हे तर प्रतिनिधिगृहात केवळ आपल्या पक्षाचे सरकार स्थापता येईल एवढे निर्णायक बहुमत त्या पक्षामागे आहे.

सिरिमाओंच्या पक्षामागे आज निर्णायक बहुमत असले तरी ते कितपत टिकेल ? पक्षाचे बहुसख्य सभासद डाव्या भूमिकेचे असले तरी त्यात फेलिक्स भंडारनायके याच्या नेतृत्वाखालील एक उजवा गटही आहे. फेलिक्स भडारनायके आपल्या प्रतिस्पर्ध्याविरुद्ध बावीस हजारापेक्षा जास्त मते मिळवून निवडून आलेले आहेत. एवढ्या मोठ्या बहुमताने दुसरा कोणताही उमेदवार निवडून आलेला नाही. गृहखाते हे महत्त्वाचे खाते त्याना मत्रिमंडळात मिळाले आहे. गृहखात्यासारखे महत्त्वाचे खाते पक्षातील या उजव्या गटाच्या नेत्याला देणे श्रीमती भडारनायके याना भाग पडले यावरून हा गट दुर्लक्ष करण्याइतका लहान नाही हेच सूचित होते श्रीमती भडारनायके ठाम डाव्या कार्यक्रमावर आपल्या पक्षाचे सामर्थ्य कितपत एकवटू शकतात यावर त्याचे यश अवलबून राहील. नाहीतर सत्ता टिकविण्यासाठी त्याना ट्रॉट्स्कीवादी व मॉस्कोवादी कम्युनिस्टांच्या पाठिंब्यावर अवलबून रहावे लागेल. पक्षांतर्गत फुटीमुळे श्री लका फ्रीडम पार्टीस यापूर्वी दोन वेळा सत्ता गमवावी लागली हे येथे लक्षात घेतले पाहिजे.

## गृहिणी उलटल्या

डाव्या आघाडीने १९६५ च्या निवडणुकीत बहुमत गमावले होते. लोकमताचा काटा पाच वर्षात पुनः डाव्याकडे का व कसा झुकला ? भाववाढ आणि तांदूळ या



## सिरिमाओ भंडारनायके

आपल्या पतीच्या खुनानंतर श्रीमती सिरिमाओ भंडारनायके यांनी श्री लंका फ्रीडम पार्टीचे नेतृत्व स्वीकारले. १९६० च्या निवडणुकीत पक्षाला बहुमत मिळाल्यावर पक्षाच्या आदेशानुसार त्यांनी पंतप्रधानपद स्वीकारले, व जगातील पहिल्या महिला पंतप्रधान होण्याचा बहुमान त्यांनी मिळविला. १९६५ च्या निवडणुकीत त्यांच्या पक्षाने बहुमत गमावले, पण पाच वर्षांनी जिद्दीने निवडणुका लढवून आतापर्यंत कोणत्याही पक्षाने मिळविले नव्हते एवढे घवघवीत यश श्रीमती सिरिमाओंच्या नेतृत्वाखाली डाव्या आघाडीने मिळविले व पंतप्रधानपदाची सूत्रे त्यांनी पुन: हाती घेतली.

समाजवादाचा पुरस्कार करणाऱ्या सिरिमाओंचा जन्म एका सरदार घराण्यात झालेला आहे. त्यांचे पूर्वज सिलोनच्या राजांचे सरदार होते. वडील १९४७ पासून सहा वर्षे सिलोन सिनेटचे सभासद होते.

चोवीस वर्षांच्या सिरिमाओंचा १९४० साली सालोमन भंडारनायके यांच्याशी विवाह झाला. भांडारनायके त्यावेळी स्थानिक स्वराज्य मंत्री होते. विशेष महत्त्वाकांक्षा नसलेली ही कर्तव्यदक्ष गृहिणी पुढे जगातील पहिली महिला प्रंतप्रधान होईल असे त्यावेळी तिलाच काय, कोणालाही वाटले नव्हते.

प्रश्नावर डाव्यांनी मुख्यत: ही निवडणूक जिंकली. डडले सेनानायके यांचा युनायटेड नॅशनल पार्टी हा पक्ष पाच वर्षापूर्वी अधिकारावर आला तेव्हा राहणीमानाचा निर्देशांक ११२ होता, तो वाढत वाढत या वर्षाच्या सुरुवातीस १३३ पर्यंत गेला. भाजीपाला व आवश्यक वस्तूच्या किमती भरमसाट वाढल्या. त्यातच तांदळाच्या रेशनमध्ये सरकारने कपात केली व दोन मापांऐवजी एकच माप तांदूळ नियंत्रित किमतीत मिळू लागला. (एक माप म्हणजे जवळजवळ २ पौंड), तांदूळाचा नियंत्रित भाव ५० सेंट होता. खुल्या बाजारात तांदूळ मिळे पण तो दुप्पट महाग असे. आम्ही तादूळ कपात रद्द करू असे आश्वासन डाव्या आघाडीने दिले होते. निवडणुकीत महिलांची मते डडले सेनानायके यांच्या पक्षाविरुद्ध जाण्यास तांदूळ कपात हे एक महत्त्वाचे कारण होते. मतदान केंद्रांपुढे पुरुषांपेक्षा स्त्रियांच्या रांगा मोठ्या होत्या. अनेक ठिकाणी स्त्रियानी ९० टक्के मतदान केले. तादळाच्या प्रश्नावर घरोघरच्या गृहिणी उलटल्याने डडले सेनानायके यांच्या पक्षास सत्ता गमवावी लागली.

तांदळाचे अशत: नियंत्रण करण्याच्या आपल्या धोरणाने तांदळाचे उत्पादन वाढेल, शेतकऱ्याची परिस्थिती सुधारेल व त्यांची मते आपणास मिळतील असा सेनानायके यांच्या पक्षाचा अदाज होता. तांदूळ उत्पादन वाढीचे बाबतीत तो खरा ठरला व शेतकऱ्याची मते मिळण्याच्या बाबतीत मात्र चुकला. तादूळ उत्पादन १९६६ ते १९६८ च्या दरम्यान साडेचारकोट बुशेलवरून ६ कोट ४० लाख बुशेलपर्यंत वाढले. १९७० मध्ये ते ७ कोट बुशेलवर जाऊन सिलोन तादळाच्या बाबतीत तीन चतुर्थांश स्वयंपूर्ण होईल. पण तांदूळ उत्पादनवाढीचा फायदा मुख्यत: मोठ्या शेतकऱ्यांना मिळाला. सिलोनमध्ये ५० टक्के शेतकरी एक एकरापेक्षा कमी जमीन असलेले आहेत. त्यांना बाजारात अधिक भावाने तादूळ विकत घ्यावा लागला. यामुळे निवडणुकीत त्यांची व किनारपट्टीचे भागातील कोळयांची मते सेनानायके याच्या पक्षास न मिळता डाव्या आघाडीस मिळाली.

## अल्पसंख्याकांची मते

गेल्या निवडणुकीत अल्पसंख्याकाची मते सेनानायके याच्या युनायटेड नॅशनल पार्टीस मिळाली होती. पण यावेळी अल्पसंख्याकांचा पाठिंबा मिळविण्यास डाव्या आघाडीने काही प्रमाणात यश मिळविले. रविवारची सुटी रद्द करून त्याऐवजी बौद्धाना पवित्र अशा दिवशी सुटी सेनानायके राजवटीने जाहीर केली. त्यामुळे कॅथालिक नाराज होते. डाव्या आघाडीने पुन: रविवारची सुटी सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. धर्मविरोधी पक्षांना मते देऊ नका असा प्रचार कॅथॉलिक धर्मोपदेशकानी केला होता. पण हा प्रचार कोणत्याही पक्षाचे नाव घेऊन केलेला नव्हता. त्याचा रोख मुख्यत: ट्रॉटस्कीवादी व कम्युनिस्ट पक्षांविरुद्ध होता. पूर्वीच्या भंडारनायके राजवटीने शाळा ताब्यात घेतल्याने त्यांच्याविरुद्ध कॅथॉलिकांचा रोष

[ पृष्ठ ६२ वर ]

# दंगली आणि सेक्युलरवादी

दंगलीबाबत 'सेक्युलर' लोकांची काय भूमिका आहे, अशी विचारणा पुण्याचे एक उदयोन्मुख पत्रकार श्री. किरण ठाकूर यांनी औरंगाबादचे प्रा. अन्सारी यांना पत्र पाठवून केली होती. प्रा. अन्सारी औरंगाबादच्या सेक्युलर फोरमचे व इंडियन कमिटी फॉर कल्चरल फ्रीडम (औरंगाबाद शाखा)चे निमंत्रक आहेत. मौलाना आझादांवरील पुस्तक त्यांनी नुकतेच संपादित केले आहे. मुस्लिम सत्यशोधक समाजातही ते आहेत. ते लिहितात ...

प्रिय किरण ठाकूर,

तुमचे पत्र मिळाले.

दंगलीच्या संदर्भात मी व माझ्यासारख्या 'सेक्युलर' लोकांनी जळगाव, भिवंडीला भेट दिली की नाही, त्याबाबतीत आम्ही काय केले असे अनेक प्रश्न तुम्ही विचारले आहेत. गैरसमज राहू नये म्हणून हे खुलासेवजा पत्र लिहीत आहे.

जळगाव, भिवंडी किंवा महाड या भागांत जाऊन काही फायदा होईल असे आम्हाला, निदान मला तरी वाटत नाही. दंगलग्रस्त लोकांना भेटी किंवा दौरे यांची गरज नाही. (ते काम मंत्री करीत आहेतच.) या लोकांना आज आवश्यकता आहे ती आर्थिक व प्रत्यक्ष मदतीची. आमच्याजवळ अशी मदत देण्याची साधने मर्यादित आहेत हे तर तुम्ही जाणताच. आहेत तेवढ्या गोष्टी आम्हाला औरंगाबाद येथेच वापरायला अपुऱ्या आहेत.

शिवाय आम्ही सध्या येथे डेमॉक्रसी कॅम्पची व्यवस्था करण्यात गुंतलो आहोत. या शिबिरात निरनिराळ्या जातीचे, धर्मांचे व ठिकठिकाणचे कॉलेज विद्यार्थी एकत्र येणार आहेत. नऊ दिवस एकत्र राहून विचाराची देवघेव होईल. पन्नासपैकी किमान वीस विद्यार्थ्यांना आमचे विचार पटले आणि त्यांनी ते प्रत्यक्षात आणले तरी आम्हाला समाधान होईल. बैठक, भाषणे, किंवा लेख या द्वारेच कार्य करता येते असे मला वाटत नाही. एकत्र राहून, खाऊन व काम करूनच 'एकते'ची भावना निर्माण होईल.

तुमच्या पत्रात तुम्ही उपस्थित केलेल्या मुद्यांची त्याच क्रमाने उत्तरे

देत आहे. जातीय दंगली १९४७ नंतरच झाल्या असे म्हणतात, ते चूक आहे. ब्रिटिश राजवटीपासून त्या चालू आहेत. ब्रिटिश गेल्यानंतर जातीय सलोखा नांदेल असा विश्वास वाटत होता तो फाळणीच्या सुमारास झालेल्या दंगलीमुळे दूर झाला. नंतर भारत व पाकिस्तानमधील परिस्थिती सुधारली की वैमनस्य मिटेल, अशी आशा होती. पण उलट स्वातंत्र्यापूर्वी शांत असलेल्या भागातही दंगली होताना दिसत आहेत. या दंगलींनी अनेक अपेक्षाभंग केले.

१ : शिक्षणाच्या प्रसाराबरोबर उदार मतवादी विचारसरणी वाढेल, असे वाटत होते. पण तसे दिसत नाही.

२ : उद्योगधंद्यातील वाढीबरोबर आधुनिक विचारसरणी समाजात दिसू लागेल, अशी कल्पना होती. पण रांची, रुरकेला, इंदूर व आता भिवंडी येथील दंगलींनी तीही धुळीस मिळविली. भारतीय समाज फक्त बाह्य स्वरूपात आधुनिक बनला.

३ : जातीय विद्वेष पसरण्यास भाषा, संस्कृती, आचार व परंपरा यासारख्या गोष्टी कारणीभूत आहेत, असे मानले जात होते. पण अहमदाबाद येथील या सर्व गोष्टी दोन्ही जमातींच्या बाबतीत सारख्या असूनही दंगल झाली.

४ : काही काळापूर्वी 'मशीदीसमोर वाद्ये वाजविली', किंवा 'गाय कापली' अशा धार्मिक भावना दुखाविणाऱ्या गोष्टींवरून दंगली होताना दिसत. पण आता दंगलीसाठी या गोष्टीची आवश्यकता दिसत नाही. जराशीही चिथावणी (slightest provocation) मिळाली की दंगली पेट घेतात.

माझ्या दृष्टीने पुढीलपैकी या ना त्या कारणाने दंगल सुरू होते :—

१ : मुस्लिम समाजाविरुद्ध संशय निर्माण करणे किंवा या लोकांबद्दल द्वेष करायला लावणे याबाबत गेली काही वर्षे पद्धतशीर प्रचार सुरू आहे. मुस्लिमांशी संबंधित कोणतीही गोष्ट जातीय किंवा राष्ट्रविरोधी मानण्यात येते. बहुसंख्यांक जमातीचा जबाबदार वर्ग अशा प्रकारचा प्रचार सातत्याने करीत आहे. त्यामुळे अल्पसंख्यांक व बहुसंख्यांक यांच्यात दुरावा निर्माण झाला आहे. यातूनच जातीय तणाव निर्माण होतो.

२ : घटनेने सर्व नागरिकांना समान हक्क दिले आहेत. परंतु ही गोष्ट सर्व समाजाच्या ध्यानात आलेली दिसत नाही. बहुसंख्यांक जमात सामाजिक व सांस्कृतिक संघटना बनवू शकते, पण मुस्लिमांनी अशी संघटना उभारण्याचा केवळ प्रयत्नही केला तरी त्याकडे संशयाने पहाण्यात येते. समाजकंटक व राष्ट्रविरोधी घटकांना (मग ते अल्पसंख्यांक जमातीचे असोत वा बहुसंख्यांक जमातीचे.) योग्य प्रकारे हाताळलेच पाहिजे, यात वाद नाही. पण मुस्लिमांनी सामाजिक, सांस्कृतिक किंवा अगदी धार्मिक संघटना बनविण्याचे ठरविले तर त्याला विरोध करण्याचे कारण नाही. उलट मुस्लिम जमात मागासलेली असल्याने अशा प्रकारच्या संघटनेची त्यांनाच जास्त गरज आहे.

३ : राष्ट्रवादाच्या पेहरावात बहुसंख्याकांचा जातीयवाद वाढीस लागलेला दिसून येतो. बहुसंख्याकांचा हा जातीयवाद व राष्ट्रवाद यांच्यातील फरक स्पष्ट करणे

आवश्यक आहे.

४ : बहुसंख्यांक जमात अल्पसंख्याकांपेक्षा जास्त शिक्षित, आर्थिक व सामाजिक बाबतीत पुढारलेली आहे. त्यामुळे देशात शांतता नांदविणे व आर्थिक प्रगतीसाठी प्रयत्न करणे अशा गोष्टींची जबाबदारी आपल्यावरच जास्त आहे, हे बहुसंख्यांक जमातीने लक्षात घेतले पाहिजे. या जमातीच्या विचारसरणीमुळे व वागणुकीमुळे अल्पसंख्यांकांवर निश्चित परिणाम होतो.

५ : शिक्षणाच्या बाबतीत मुस्लिम मागासलेले आहेत. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती गरीबीची आहे. याच गोष्टीचा फायदा तथाकथित धार्मिक व राजकीय नेते घेतात. अज्ञान व मागासपणा यांच्या दरीतून मुस्लिमाना वर काढले पाहिजे. यातूनच त्यांच्यात जागृती व विश्वास निर्माण होईल. बहुसंख्यांकांच्या जोडीने व बरोबरीने वाटचाल करण्यासाठी या गोष्टी केल्याच पाहिजेत.

६ : संधिसाधू, तत्वशून्य आणि तडजोडीचे राजकारण हेही एक कारण आहे. सत्ता मिळविणे व तिला चिकटून राहणे यामुळे प्रांतवाद, जातीयवाद असे संकुचित विचार प्रसृत होतात. देशातील जवळजवळ सर्व पक्ष याबाबतीत दोषी आहेत. (जातीय पक्षाचे तर बोलायला नकोच ! )

७ : अप्रगत भागात सरकारी यंत्रणेलाच 'नेत्या'चे काम करावे लागते. ही यंत्रणा निःपक्षपाती, कर्तव्यदक्ष, जागृत असली पाहिजे. ती भ्रष्टाचार व राजकीय ढवळाढवळ यापासून दूर असणे अत्यंत आवश्यक आहे.

८ : शैक्षणिक, सांस्कृतिक, समाजिक व इतर क्षत्रातही सुधारणा करून 'भारतीय' समाज स्थापन करण्याची आवश्यकता आहे. यासाठी भारतव्यापी चळवळ हाती घेतली पाहिजे. राजकीय पुढारी क्षुद्र स्वार्थापलीकडे काही पाहूच शकत नाहीत. निःस्वार्थी, त्यागी व बुद्धिवादी समाजसेवकानी या कामासाठी बाहेर पडावे. अशा सामाजिक चळवळीतूनच अनेक प्रश्न सुटू शकतील.

९ : समाजविघातक शक्ती प्रबळ व पद्धतशीरपणे संघटित झालेल्या आहेत हे खरे. पण दोन्ही जमातीमधील बहुसंख्य लोक शांतिप्रिय व या विघातक शक्तीना विरोध करणारे आहेत. ही दुसरी बाजू योग्य प्रकारे संघटित केली पाहिजे. ही आघाडी विघातक शक्तीना उखडून काढू शकेल.

१० : शेवटी, हिंदु-मुस्लिमांची संयुक्त आघाडी उभारली पाहिजे. यामुळे एकमेकांविषयी असलेले विनबुडाचे गैरसमज, शंका व भयगंड दूर होतील. दंगली ही काही फक्त मुस्लिमांची समस्या नाही. शांतता हवी असलेल्या सर्व भारतीयांना हा प्रश्न भेडसावीत आहे. दोन्ही जातीमध्ये समान सामाजिक जागृती निर्माण करूनच जातीय सलोखा निर्माण होऊ शकेल. जनतेचा पाठिंबा ही एकच गोष्ट देशात कायम शांतता नांदविण्याची शाश्वती देऊ शकेल.

मला वाटते, याबाबतीतील माझी भूमिका मी पुरेशी स्पष्ट केली आहे.

कळावे. लोभ आहेच, वृद्धी व्हावी. आपला,

एस्. ए. अन्सारी

देश
आणि
कोकण
यांच्या
सीमेवरील
एका गावाची गोष्ट

# म्हादू रोडे

दुपार होती तरी हवेत गारवा होता. आम्ही महागोंडची वेस ओलांडली होती; पश्चिमेकडे निघालो होतो. आम्हाला मौजे वझरे बघावयाचे होते. वझरेकर मंडळी अगोदरच महागोंडला आली होती. म्हादू रोडे पुढे पुढे पळत होता. म्हादू रोडेच्या तोंडाची टकळी सारखी सुरू होती. माणूस पन्नाशी ओलांडलेला, शिक्षणाचा गंध नाही. गावात पोटापुरती जमीन. फक्त एका मुलीव्यतिरिक्त स्वतःचे कुणी नाही. गाव हे माझे कुटुंब आहे, गावातील माणसे ही माझी माणसे आहेत, हे तत्व प्रत्यक्ष आचरणात आणणारा म्हादू आमच्याबरोबर सारखा पळत होता.

आमच्या सोबत होते 'माणूस'चे संपादक श्री. ग. माजगावकर, माझे मोठे बंधू मारुतीराव गायकवाड, आजरा येथील शाळेचे मुख्याध्यापक एस्. व्ही. पाटील, मी स्वतः आणि इतर ग्रामस्थ. स्थानिक पुढाऱ्यांनी उपेक्षिलेले हे अंदमान मौजे वझरे बघावयाचे होते—मौजे वझरे (ता. आजरा, जि. कोल्हापूर) मौजे महागोंडच्या पश्चिमेला डोंगराळ विभागात वसलेले आहे. गाव कसले, एक छोटीशी शंभर उंबऱ्याची, हजाराच्या आसपास लोकसंख्या असलेली वस्ती आहे. आजरा तालुक्यातील पश्चिम विभाग असाच डोंगराळ आहे. निसर्गाने वेढलेला. क्षणाक्षणाला पक्ष्यांच्या कोलाहलाने मन भुलविणारा हा विभाग आम्हीच उपेक्षित बनविला आहे.

गावाला गावच म्हणता येत नाही. ग्रामरचनाच तेथे नाही. एक घर येथे तर दुसरे तेथे गावात जाण्यास रस्ताच नाही; मग मुलांना शाळा कोठली असणार ? लोक जगतात जगायचे म्हणून. मोल मजुरी करून, करवदे विकून. मौजे वझरे गावाकडे पुढारी फिरकत नाहीत. त्याची जीप तेथपर्यंत जाऊ शकत नाही. माणसे आहेत पण आम्हीच बुजरी बनविलेली कर्ते तरुण शहराकडे. मोडकी, तोडकी माणसे आणि त्यांच्या सुना आणि गल्लीभर दगडांनी खेळणारी त्यांची पोरे ह्या व्यक्तिरिक्त कोणी नाही. पण म्हादू रोडेच्या रूपाने सर्व साहेबाना सतावणारे वारे मात्र गावभर फिरत असते. गाव किर्र जंगलानी वेढलेले. म्हादूच्या प्रश्नांची सरबत्ती नको

म्हणून बहुतेक साहेबांची वा पुढाऱ्याची गाडी महागोंडहून परत उत्तूर मार्गेच धावू लागते

'साहेब, ह्यो रस्ता बगा, गावातील लोकांनी केलाय!' रस्ता फारच चागला केला होता. पण खडी न पसरल्याने श्रम वाया जात आहेत. पाऊस येतो आणि प्रत्येक वर्षी रस्ता धुऊन जातो. लोकाचे श्रम दरसाल फुकट जात आहेत. कोणीही तिकडे लक्ष देत नाही. म्हादू बोलत होता, 'साहेब, किती राबायचं आम्ही. एक वेळा आमच्या दुःखानं दगडाला घाम फुटत होता, देव आमच्याशी बोलत होता; पण आज आम्ही साग़ू लागलो की सारी हसण्यावारी नेत्यात!'

ग्रुप ग्रामपंचायतीने गावाला विकासाचा फायदा होईना म्हणून मौजे वझरे ही स्वतंत्र ग्रामपंचायत निर्माण झाली. कराच्या रूपाने मिळणारे गावचे उत्पन्न साठवून एकादी मोठी योजना राबविण्याचा मडळीचा निर्धार आहे. ग्रामपचायत वेगळी झाल्यानतर गावाने ओरडून ओरडून शाळेची मंजुरी घेतली. (अमुक इतके गावकरी नसबदी शिबिराला हजर ठेव म्हणजे शाळेला मजूरी देतो असे म्हादूला 'वरून' सांगितले गेले होते म्हणे!) म्हादू आणि त्याचे ग्रामस्थ राबले. सरस्वतीचे मंदिर गावाच्या वेशीपाशी झाले आहे. म्हादू रोडे आम्हाला आनदाने शाळेची इमारत दाखवित होता. त्याचा उत्साह काही औरच होता. त्या म्हाताऱ्या चर्येवर समाधानाचे चिन्ह सारखे दिसत होते. तरुणालाही लाजविणारे बळ त्याच्या अगी होते.

माणसे मोकळी असली, त्यांच्या पाठीशी संसार नसला म्हणजे उपद्व्यापी होतात. यातून गावगुंड निर्माण होतात, पण म्हादू याला अपवाद आहे. आम्ही मोडक्या चावडीजवळ गेलो डाबाला एक पाटी लावली होती 'छोटे कुटुब सुखी कुटुंब' विसंगती जाणवली. सर्व मिळून आठ मुले शाळेच्या हजेरी पटावर, तेथे कुटुंब नियोजन? हसू आवरेना. 'म्हादू शाळेत पोरे कुठली आणणार?' 'साहेब, ते काम माझ्याकडे लागलं. त्याची काळजी तुम्ही करू नका! ते काम माझं हाय!'

म्हादूने करवदे आणली. शबरीची आठवण झाली. चहा गाळून प्यावयास दिला. आम्ही निघालो. म्हादू मागून पळत होता, सांगत होता, 'साहेब, तुमच्या महागोंड-साठी तुम्ही खूप केलत, माझी एक विनती हाय, पुढल्या वर्षाला महागोडची एस्. टी. गाडी वझऱ्याला घेऊन या! आता गरिबाना जास्त राबवू नका!' म्हादूने हात जोडले होते. डोळ्यात एक वेगळेच तेज चमकत होते.

आम्ही जात होतो, पण पायाखालची जमीन—म्हादूने केलेला रस्ता—सारखा त्यांच्या श्रमाचे चटके देत होती. मन सारखे सतावत होते हा रस्ता व्हायला पाहिजे. म्हादूची इच्छा पुरी व्हायला हवी आहे. म्हादूचे स्वप्न साकार व्हायला हवे आहे. डोके सुन्न आहे. पाय रामतीर्थाकड—आजऱ्याकडे चालले आहेत म्हादू रोडे डोळ्यापुढून हालत नाही.

सुरेश आप्पाजी गायकवाड

कोकण विकास

# दोन व्यक्ती

अशोक हळबे

नुकताच एका मंत्र्यांचा दापोलीत एक कार्यक्रम झाला. कार्यक्रम चालू असताना दोन व्यक्ती एकमेकात बोलत होत्या. त्यातील एक होती गॅझटेड ऑफीसर तर दुसरी व्यक्ती होती तालुका पंचायत समितीची उपसभापती. कार्यक्रमाला सुरुवात झाली. एक एक वक्ता बोलायला उभा रहायचा. नेहमीच्याच पद्धतीने आजपर्यंतच्या या भागात झालेल्या मोठमोठ्या व्यक्तीची नावे घ्यायचा व त्यांची समयाला साजेशी उदाहरणे सांगायचा.

प्रत्येक वेळी तीच तीच भाषणे ऐकून दोन्ही व्यक्ती निराश झाल्या होत्या. न राहवून शेवटी एकाने म्हटले, 'तेच तेच ऐकून कटाळलो बुवा.' लगेच दुसऱ्या हजर जबाबी माणसानं उत्तर दिलं, 'काय करणार? नवीन कोणी मोठी व्यक्ती या भागात झालीच नाही म्हणून घ्यावी लागतात तीच तीच नावं.

मनाला ते थोडेसे पटलेही. पटले एवढ्याचकरिता की खरोखरच टिळक, रँग्लर परांजपे, साने गुरुजी, महर्षि कर्वे यांच्या मालिकेतील माणसे आज या भागात नाहीत. पण नंतर थोडा विचार केला तेव्हा लक्षात आलं की यांच्या वेळची व आजची परिस्थिती यात फरक आहे. हे सर्व लोक शहरात गेले. तेथे मोठे झाले व नावारूपास आले. आज मात्र विचारवंत माणूस, शहरातून खेड्यात जा व त्यांचा विकास करा असे म्हणत आहे. व अनेकजण ज्यांना काही करावेसे वाटते ते खेड्यात येऊ लागले आहेत. जेव्हा या अशा व्यक्तींच्या योजना यशस्वी होतील,

खेड्यांचं भाग्य उजळेल तेव्हा वरील व्यक्तींच्याबरोबर त्यांचही नाव घेतलं जाईल.

एवढी प्रस्तावना करण्याचं कारण की अनेक माणसं आज येथे तळमळीनं काम करीत आहेत. नव्या नव्या योजना, नवे नवे प्रयोग चालू आहेत. अजून त्यांना प्रसिद्धीचे शिखर गाठता आलेले नाही. पण आज ना उद्या ते निश्चित सर होईल. दापोली पुरतेच लिहायचे झाले आणि आजच्या विषयासबंधांत ज्यांचा आवर्जून उल्लेख करावा लागेल अशा दोन व्यक्ती म्हणजे एक मुंबईचे ख्यातनाम डॉ. एकनाथ गोळे व दुसरे दापोलीचे बाबा उर्फ श्रीपाद महाजन.

खरं म्हणाल तर ह्या दोन व्यक्ती म्हणजे एका काठीची दोन टोकं आहेत. जवळ येणं फार मुष्किल. काठी जर वाकवावी म्हणावं तर मध्येच मोडण्याची धास्ती. न आणावी म्हणावं तर अपेक्षित काम होणार नाही. पण ह्या काठीवर कोकण विकासाच्या भावनेचं असं काही वजन पडलं आहे की दोन्ही टोकं आता अलगद एकत्र आली आहेत.

कदाचित दोन टोकं म्हटल्यावर अनेकांना आश्चर्यही वाटेल. पण तसं का म्हटलं याचं कारण हे पहा—

डॉ. गोळे हा माणूस मुंबईसारख्या शहरात राहणारा. प्रॅक्टीस अशी चालू आहे की खरच ह्यांनी जर ठरवल काहं ही न करता आरामात रहायचं तर सहज शक्य. एकच काय पण चार चार मोटार गाड्या जवळ ठेवू शकतील. आज वय आहे सुमारे ५० च्या आसपास. आपल्या व्यवसायाशी अत्यंत समरस झालेला त्याच-बरोबर राजकारणाबद्दल अत्यंत घृणा असलेला.

नेमकी याच्या उलट स्थिती आहे बाबा महाजनांची. वय आहे तीसच्या आसपास. रहातात दापोलीत म्हणजे मुंबईच्या एका गल्लीतच. आर्थिक स्थितीही सामान्यच. व्यवसाय आहे वॉच रिपेअरींगचा पण नावापुरताच. म्हणजे त्यातील कसब त्याचे-जवळ आहे. पण त्यात मन ओतलेलं नाही. ते आहे सारे राजकारणात, कोकण-विकासात व्यवसायाकडे दुर्लक्ष झालं की आर्थिक स्थिती कशी सुधारणार? समाज-सेवा म्हटली की घरचा घास खाऊन लष्कराच्या भाकरी भाजायच्या.

बोला आता आहेत की नाहीत परस्पर विरोधी दोन टोकं? पण...

कोकण विकासाच्या तळमळीच्या भारामळे ती एकत्र झाली. शक्य ते कार्य त्यांनी सुरू केल. निव्वळ कागदी घोडे नाचवले नाहीत. भाषणे तर झोडली नाहीतच आणि इतर कोणत्याही प्रचलीत लोकशाही मार्गाने (उपोषणे-मोर्चे वगैरे) आपला कार्यक्रम पुढे ढकलला नाही.

डॉक्टरनी मुंबईहून इकडे येऊन लक्ष घालण्यास सुरुवात केली. सुप्रसिद्ध परशु-राम पॉटरीजच्या श्रीमान गणपुले यांच्या सशोधनाचा फायदा घेऊन त्यांनी दापोलीपासून जवळच असलेल्या गव्हे या गावी कौलाचा कारखाना सुरू केला. त्यासाठी कोकण विकास प्रायव्हेट लिमिटेड नावाची एक कपनी स्थापून इतरांनाही

त्या कार्यात सहभागी करून घेतले. (या कारखान्याबद्दल पुढे कधीतरी सविस्तर लिहीन.) विसावा नावाची एक गृहबांधणी संस्था काढली व शहरी लोकांनी इकडे यावं, एखाद हक्काचं घर बांधून कायमचा संबंध ठवावा, इथल्या सृष्टिसौंदर्याचं आकंठ पान करावं अशी एक योजना काढली.

इतकेच नव्हे तर दरवेळी कोणी ना कोणी अधिकारी किंवा बडा पाहुणा आणून इकडे काय काय करता येईल त्याची पहाणी चालू ठेवली. डोक्यातून हा विचार कधी जातच नाही. मग कधी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे लोक बरोबर असतात तर कधी उद्योग व पर्यटन खात्याच्या सचालकांना ते इकडे घेऊन येतात. केव्हा पु. रा. बेहेरे याच्यासारखा पत्रकार त्यांच्याबरोबर असतो तर कधी माणूसचे माजगावकर येणार आहेत असे ते कळवितात. कधी चाफेकरांसारख्या मोठ्या इंजीनिअरना इकडे पाठवून देतात तर त्याचे सहव्यवसायी डॉक्टर्स तर नेहमीच त्यांच्याबरोबर असतात. या सर्व विकासाच्या विचारातून खंडेराव रांगणेकरांसारखा क्रीडा क्षेत्रातला माणूसही त्याच्या दृष्टीतून दूर जात नाही.

अशा या तळमळीमुळे श्री. महाजन यांनी आपली योजना डॉ. गोळयांना सागितली. हेतु हा की डॉक्टरांचा सर्वत्र बडया बडया लोकांशी परिचय. त्याचा उपयोग होईल व आपली योजना लवकरात लवकर मार्गी लागेल.

त्याची ही योजना थोडक्यात अशी होती –

जवळच एक आजर्ले नावाचे गाव आहे. तेथे एक खाडी आहे. सदर खाडी दापोलीच्या जोगनदीची आहे. भरतीच्या वेळी खाडीमध्ये सुमारे ६ मैल आंतपर्यंत नदीच्या पात्रात खारे पाणी शिरते. त्यामुळे नदीच्या पाण्याचा पिण्यास अगर शेतीस कशासही उपयोग होत नाही. म्हणून आजर्ले गावापासून आत जवळच कोंगळे नावाचे गावाजवळ सदर खाडीवर बंधारावजा पूल घालायचा. म्हणजे खारे पाणी आत जाणार नाही, व गोडया पाण्याचा साठा होईल. त्याचा उपयोग खाडी काठी पसरलेल्या सुमारे एक हजार एकर भातशेतीला दुबार करण्यात होईल; आजूबाजूच्या गावाना पिण्याचे पाणी मिळेल. डोंगरातील १०,००० एकर जमीन बागायती होऊ शकेल. खाडीवर बंधारा वजा पूल झाल्यावर बारमाही वहातूक सुरू होईल. पावसाळयात बंधाऱ्याचे दरवाजे मोकळे करून पाणी सोडून दिले की खाडीतील गाळ समुद्रात जाऊन पात्र खोल होईल. आणि एखादी आईस फॅक्टरी काढता येईल व आसपासच्या मच्छीमारांची सोय होईल. आज आंजर्ला खाडीत सुमारे २०० छोटया होडया व ४५ ट्रॉलर्स मच्छीमारीचा व्यवसाय करतात. बर्फाची व पाण्याची सोय नसल्याने हा व्यवसाय खुंटला आहे त्याची भरभराट होईल.

श्री. महाजन यांच्या अंदाजाप्रमाणे सदर बंधाऱ्याला सुमारे २० लाख रुपये खर्च होईल.

ही योजना कानी पडल्यावर डॉ. गोळे यांनी महाराष्ट्राचे माजी चीफ इंजिनिअर व सध्याचे पुण्याचे नगरसेवक श्री. ग. ल. चाफेकर यांना सांगितली. त्यांनी ती प्रत्यक्ष पहाण्याचे कबूल केले. त्याप्रमाणे दि. १० व ११ मे रोजी ते स्वतः व पुण्याचे श्रीमान् बाळासाहेब साठे फरशीवाले हे येथे आले व प्रत्यक्ष हिंडून त्यांनी ही योजना पाहिली. मलाही त्यांच्या समवेत फिरण्याचा योग आला.

संपूर्ण योजना पाहिल्यावर ते म्हणाले, "श्री. महाजन यांच्या कल्पनेप्रमाणे बंधारा होऊ शकेल पण त्यामुळे सांचलेले पाणी मात्र फारच अपुरे पडेल. त्याऐवजी जर बंधारा न बांधता धरण बांधले तर फायदा अधिक होईल. महाजन यांच्या योजनेतील सर्व फायदे तर मिळतीलच. शिवाय छोटेसे विद्युत केंद्रही होऊ शकेल."

श्री. चाफेकरांनी सुचवलेली सामान्यतः आकडेवारी अशी आहे – १२५ फूट उंचीचा बंधारा घातल्यास तीन हजार दशलक्ष घनफूट पाणी त्यात साठेल. तेवढे पाणी ५०,००० माणसांना प्यायला उपयोगी पडेल; त्यात एक आईस फॅक्टरी होईल व बागायतीला १०,००० एकरांना ते पाणी मिळेल. खर्च सुमारे १ कोटी रुपये येईल. विद्युत् निर्माण केंद्र करायचे झाले तर खर्च वाढेल.

या योजनेत दोन तोटे आहेत. एक म्हणजे सध्याची खाडी काठची जमीन पाण्याखाली जाईल व गावांचे पुनर्वसन करावे लागेल. हा तोटा विचारात घेतला तरीही ही योजना अत्यंत फायदेशीर ठरेल.

जर ही योजना यशस्वी झाली तर अशाच प्रकारे कोकणातील प्रत्यक खाडीवर धरण बांधून कोकणचा चेहरामोहराच बदलून जाईल.

या योजनेमुळे अर्धा दापोली तालुका भरभराटीस येईल. विकासाचा मार्ग निश्चित सुकर होईल. मार्ग कठीण आहे. कारण तो कोकणातला आहे. कोकण मुळातच डोंगराळ व खडकाळ तर त्यातला मार्ग तरी सोपा कसा असेल ? कसाही असला तरी आपण तो आक्रमणे आवश्यक आहे. त्यातच खरे यश आहे. म्हणतात ना – Nothing succeeds like success.



# आब्बाजान

" आब्बाजान सीरियसली वुंडेड, स्टार्ट इमिजिएटली " ही तार वाचून प्रवीणचा चेहरा खरकन् उतरला. त्याचे सारे अवसान गळून गेले. छाती धडधडू लागली – घशाला कोरड पडली. मूर्तीपूरच्या सिव्हिल सर्जनची ती तार होती. दवाखान्यात नेहमीप्रमाणे गर्दी करून उभे राहिलेल्या रोग्यांना, कंपाउंडर, नर्स साऱ्यांना उद्देशून तो एकदम म्हणाला, " आज मला गावाला जायचंय–दोन तीन दिवसांनी या. " आणि खुर्चीवरून तो ताडकन् उठला. उगीचच त्यानं आपल्या डोक्यावरून हात फिरवला. कपाळावरचा घाम हातरुमालानं अलगदपणे टिपला. साऱ्यांनाच आश्चर्य वाटलं–' कसली महत्त्वाची तार आली? एकाएकी डॉक्टर कोणत्या गावाला निघाले ?' हेच प्रत्येकाच्या मनात घोटाळू लागले. त्याच दवाखान्यात स्त्रीरोगचिकित्सक म्हणून काम करीत असलेल्या आपल्या पत्नीकडं प्रवीण झपझप निघाला.

" लता ! मी आत्ताच्या गाडीनं मूर्तीपूरला जातोय ! "

" मूर्तीपूरला ! तिथं तर जातीय दंगल चालू झालीयनं ?" लता काळजीच्या स्वरात म्हणाली.

" मला गेलंच पाहिजे लता काहीही झालं तरी ! आब्बाजान जखमी झालेत " प्रवीणचा कंठ दाटून आला होता. त्यानं ती तार लतेच्या हातात दिली. लतानं ती झरंदिशी वाचली. तिचाही चेहरा काळवंडून गेला

कापऱ्या आवाजात ती म्हणाली, " पण प्रवीण ! तिथं जाण्यात तुम्हाला धोका आहे. आब्बाजान काय पिकलं पान – "

" बस्स ! जास्त काही बोलू नकोस. मला गेलच पाहिजे " थोडयाशा करडया आवाजात प्रवीण बोलला. दवाखान्याच्या किल्ल्या लतेच्या हातात देऊन तो झपाझप बाहेरही पडला.

समोर दिसली ती टॅक्सी प्रवीणनं बोलावली अन् तो स्टेशनकडं निघालाही ! लता बिचारी त्याचा वाटेकडं भकास नजरेनं पाहात उभी राहिली. तिचीही छाती धडधडू लागली. प्रवीणच्या आयुष्यात आब्बाजानना किती महत्त्व आहे हे ती

गेल्या आठवड्यात मूर्तीपूरला जातीय दंगल चालू झाली. प्रवीणनं 'तिकडे जाऊ नका' म्हणून आब्बाजानना कळवलं, तरी ते गेलेच...............

एस्. ए. कुलकर्णी

जाणत होती; पण जातीय दंगलीच्या खाईत त्यानं असं निघून जावं हे काही तिला तितकंसं बरं वाटलं नाही. तिला एकदा वाटलं आपणही त्याच्याबरोबर जावं – पण दवाखाना सगळाच बंद कसा करायचा – घरात छोटया आशाकडं कोण पाहणार – कोंडीत सांपडल्याप्रमाणे तिचा जीव बेचैन होऊन गेला.

प्रवीण मूर्तीपूरला जाणाऱ्या आगगाडीत चढला. पहिल्या वर्गाच्या डब्यातही बेफाम गर्दी होती. एका बर्थवर कसाबसा तो अंग चोरून बसला. खिडकीला डोकं टेकून तो बसला नि गाडी चालू झाली. वाऱ्याने त्याला जरा बरं वाटलं; पण त्याचं बेचैन मन मागच्या गोष्टी आठवू लागलं –

जिवान शहरात प्रवीण आपल्या छोटयाशा घरकुलात तेव्हा रहात होता. वडील वारल्यानंतर त्याच्या आईने त्याला व मायाला तळहातावर वाढविलं. मास्तरणीची नोकरी करीत तिनं प्रवीणला शिकविलं. हायस्कूलमधून तो महाविद्यालयात दाखल झाला. इंटर सायन्सची परीक्षा आटोपली–प्रयोग परीक्षाही झाली पुढं मेडिकल कॉलेजमध्ये जायचं म्हणून परीक्षेच्या निकालाची तो आतुरतेनं वाट पहात होता–एवढयात एकाएकी गावात जातीय दंगल सुरू झाली. "काटो–मारो–खतम करो काफरको" या आरडाओरडीला सर्वत्र सुरुवात झाली. धडाधड घरं पेटत होती; दुकानं जळत होती – कोण, कुठला, कुणाचा याचा काहीही विचार न करता गल्लीबोळातनं सुरामारी चालू झाली. मानवी रक्त सवंग होऊन गेलं – जिथं तिथं रस्त्यावर ते सांडलं गेलं. मेलेल्यांची कुत्तरओढ सुरू होती. पोलीसांच्या शिट्टया कर्णकठोरपणे वाजत–धडाधड धोंडे त्याच्या अंगावर कोसळत. कुठे विटा फेकल्या जात – हातबॉंब फेकले जात. वारवार लाठीमार–अश्रुधूर यांचा सर्रास वापर व्हायचा. जमाव पांगेनासा झाल्यावर बंदुकीच्या फैरी झडायच्या – लोक क्षणभर विरळ व्हायचे; पण दुसऱ्या गल्लीत प्रचंड जाळपोळ सुरू असायची–धुराचे दाट लोट उठायचे – त्या मागोमाग प्रचंड ज्वाला धुमसु लागायच्या. मुठीत जीव धरून प्रत्येकजण कसाबसा दिवस–रात्र ढकलायचा.

प्रवीणच्या डोळ्यापुढं जिदानचं ते भयंकर दृश्य दिसत होतं. अंगाला थरथरून सोडणारे ते भयानक दिवस—आत्ताही त्याचा जीव कासावीस होऊन गेला. त्या दिवशी प्रवीण लपत छपत बाजारातून काही जिन्नस आणायला म्हणून बाहेर पडलेला — जीव मुठीत धरून कसाबसा तो आपल्या गल्लीकडं परतला अन् त्याच्या डोळ्यापुढे अंधारीच आली. त्या गल्लीचा कोपरोन कोपरा धगधगून जळत होता —

"आई ! माया !" आक्रोश करीत तो रडत मटकन खाली बसला. — त्याच्या सांत्वनाला कुणी कुणी नव्हतं — "काटो — मारो"ची आरडाओरड ऐकू येत होती — बंदुकीच्या फैरी झडतच होत्या — भकास नजरेनं प्रवीण पुढे सरकत होता — वेळ कोणती होती — तो कुठे चालला होता हे त्याचं त्याला समजत नव्हतं — डोक्यावर घण मारल्याचा भास होत होता. तो पडत होता — उठत होता — त्याला खरचटत होतं, लागत होतं — कुठे सुरी लागल्याचाही त्याला भास होत होता — पण त्याला काहीच समजत नव्हतं — काही ध्यानात येत नव्हत. कोपऱ्याकोपऱ्यावर ठोसाठोशी, गुद्दागुद्दी, भोसकाभोसकी तो उघड्या डोळ्यांनी पहात होता. पेटलेली घरं—दुकानं तो भकास नजरेनं न्याहाळीत होता. [तो कुठे तरी बसत होता — कुठेतरी उठून चालत होता. रस्त्यावर वाहनं नव्हती — जिथे तिथे पोलीस अन् दंगेखोर — शांततेचं कुठंही नाव नव्हतं. सारा नंगा नाच. कुणीही उठाव नि कुणालाहि कुठेही पळवावं असा तो अमंगल मामला. सगळीकडे कर्णकटु आवाज उठत होते. आरोळ्या, रडारड, बोंबाबोंब — काय भयानक दृश्य ते — किती भयकर दिवस. तेवढ्यात मानवाच्या या नंग्यानाचामध्ये निसर्गानेही आपला हात धुऊन घेतला. भयंकर तुफान; आणि बेमुर्वत पाउस सारखा कोसळू लागला. रस्त्यांतून पाण्यांचे पाट वाहू लागले — त्यातून जागोजाग मरून पडलेले मानवी देह पसार होऊ लागले — प्रवीण चालतच होता — कुठे कोण जाणे ! किती वेळ — दिवसा की रात्री, त्याला काहीच उमगत नव्हतं — वेड्यासारखा तो वणवण भटकत होता. डोळ्यात सारी निराशा दाटलेली 'काटो मारो' या आवाजाच त्याला भय नव्हतं की वरून अव्याहत कोसळणाऱ्या पावसाची फिकीर नव्हती—थंड वाऱ्याचं भान नव्हतं; अंगावरच्या कपड्याच्या चिंध्या उडालेल्या — जागोजाग रक्त ठिबकलेलं — डोक्यावरचे केस अक्षरशः पिंजारलेले —

तोच बाजूने पाण्याचा एक प्रचंड लोंढा अंगावर आला —

"अरे मरेगा — मरेगा" म्हणत कुणी तरी त्याच्या गळ्याला पाठीमागून शर्टला धरून ओढलं. प्रवीणनं मागं वळून पाहिलं — कुणी दाढीवाला गृहस्थ त्याला दरदर ओढून नेत होता. त्याला वाटले संपला कारभार. त्यापुढचं त्याला काहीच कळालं नाही. जवळजवळ त्याची शुद्धच गेलेली होती.

प्रवीण शुद्धीवर आला तो त्याला आपण एका मोठ्या दिवाणखान्यातल्या मोठ्या पलंगावर पडलेलो आहोत असं दिसून आलं. शेजारी एक दाढीवाला उंचापुरा

माणूस बसलेला.

"होशमे आये बेटे तूं!" म्हणत त्या माणसाने प्रवीणच्या डोक्यावरून – कपाळावरून – गालावरून हात फिरविला.

"मी कुठं आहे? आई कुठं आहे? माया कुठं आहे?"

"हां हां बेटे! तुम बीमार हो! तुम अच्छे हो – सब मालूम हो जायगा! बेटा! तूं मेरे घरमे हो – आब्बाजानके घरमे"

"तुम्ही मुसलमान आहात! मला मारा! सुरीनं भोसका!" प्रवीण ओरडून म्हणाला.

"ऐसा नही बेटा! मै मुसलमीन हूँ; लेकिन पैगंबरका पैगाम अच्छी तरहसे सुननेवाला हूँ! डरो मत बेटे–जल्दसे जल्द अच्छा हो जाय–सब ठीक हो जायेगा." आब्बाजान गदगदलेल्या आवाजात म्हणत होते अन् त्याला मायेनं कुरवाळीत होते–

गाडी कुठल्यातरी स्टेशनवर थावली आणि 'चाय गरम' च्या आरोळ्या उठू लागल्या प्रवीण थोडा फार देहभानावर आला. बर्थवर आणखीन थोडा ऐसपैस सरकून बसला. त्याला चहा घ्यावासा वाटला नाही–गाडी सुरू झाल्यावर त्याचं मन पुन: भूतकाळात समाविष्ट झालं.

–प्रवीण त्या आजारातून हळूहळू बरा होऊ लागला. डॉक्टरांच्या औषधापेक्षाही आब्बाजानच्या मायेच्या हातानं तो सुखावत होता.

"मै जिंदगीमे अकेला हूँ–तुम मेरे बेटे हो! लाडले बेटे हो" म्हणत आब्बाजान त्याला कुरवाळायचे त्याला मिठीत घेऊन ते त्याच्या डोक्यावरून, गालावरून हात फिरवीत. प्रवीणला मोठं आश्चर्य वाटायच–जीवनातलं गूढ काही केल्या त्याला उकलत नव्हतं. आब्बाजान कुणाचा कोण! ओळखदेख नाही; पण पोटच्या पोराप्रमाणे त्याच्यावर माया करीत होता. जवळ बसून त्याच पथ्यपाणी सांभाळीत होता. त्याला स्वत:च्या हाताने भरवायचा. त्याची सारी शुश्रूषा मन:पूर्वक करीत होता. प्रवीणला आश्चर्य वाटायचं–हा जातीचा मुसलमान इतका मनाचा कनवाळू कसा? हे गूढ त्याला उकलत नव्हतं. शहरात अद्याप दंगल चालूच होती–रोज रोज कोणती ना कोणती घरं पेटल्याचं–मोहल्ले जळाल्याचं त्याच्या कानावर येत होतं. कर्फ्यूचा अमल शहरात सुरू झाला होता बंदुकीच्या फेरी झडत होत्या. प्रवीण कधी डोळे मिटून वा कधी उघडे ठेवून भकास नजरेन आई–मायाच्या आठवणी काढीत बसून राहायचा त्यावेळी त्याच्या सर्वांगावरून मायेचा हात फिरवून आब्बाजान त्याला म्हणायचे–

"हिम्मत नही छोडना बेटे! तुम्हारे मांजी और बेहनजीका तलाश कर रहा हूँ–पुलीसमे हर रोज जांच करता रहा हूँ. मगर कुछ मालूम नही होता. कुछ पता नही लगता. हिम्मत छोडना नही मेरे बेटे!" अशा वेळी आब्बाजानच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत असत. ते त्याला आपल्या मिठीत घेत, त्याच्या पाठीवरून हात

फिरवीत आणि मग दोघांच्याही डोळ्यांतून अश्रूंचा एकमेकांवर अभिषेक सुरू होई.

"बेटा! दुनियामें अब इन्सानीयत बाकी नही है. सब लोग हैवान बन चुके है. लेकिन हिम्मत नही छोडना बेटे." अब्बाजानचे ते शब्द प्रवीणला आताही आठवत होते. त्यांचा शांत, स्नेहशील, प्रेमळ चेहरा त्याच्या डोळ्यासमोर उभा राहिला. त्यांची ती शुभ्र दाढी, पित्याच्या वात्सल्याने ओतप्रोत भरलेले ते बोलके डोळे, ते धारदार नाक आणि ओठावरचं स्मित–सारं त्याला आठवत होतं एकसारखं.

प्रवीणनं बैठकीवरची कूस बदलली–गाडी धावतच होती वेगात आणि प्रवीणच्या डोळ्यापुढे गतकालीन गोष्टी चित्रपटातील दृश्याप्रमाणे पुढे पुढे सरकत होत्या.

अब्बाजानच्या घरी प्रवीण हिंडू फिरू लागला. त्याचं निराश मन हळूहळू निवळू लागलं, पण आई-मायाची आठवण झाली की त्याचा जीव कासावीस व्हायचा. अब्बाजाननी स्थानिक व मोठमोठ्या वर्तमानपत्रांतून 'हरवले आहेत' या सदराखाली प्रवीणच्या आईविषयी व मायाबद्दल खुलासेवार निवेदने प्रसिद्ध केली–पण कशाचाही काही उपयोग नव्हता. 'बेपत्ता' सदराखाली त्या मायलेकींची नावे पोलीसांच्या दप्तरी कधीच दाखल झालेली होती. प्रवीणचे रडून रडून डोळे सुजून जात. तेव्हा अब्बाजान त्याला लहान मुलाप्रमाणे जवळ घेऊन खांद्यावर थोपटीत म्हणायचे – "बेटा! कितना रोएगा तू! ये गंदी दुनियामे इसका क्या फायदा होगा–खासकर तुम बीमार हो जायगे–हिम्मत नही छोडना बेटे" शहरातला दंगा शांत झाला होता–सरकार नुकसानीचा अंदाज घेण्यात निमग्न होते. चौकशी सुरू होत्या.

इंटर सायन्सचा रिझल्ट लागला. प्रवीण प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याची वार्ता अब्बाजाननी पळत पळत हर्षाने फुललेल्या चेहऱ्याने सुनावली. त्याक्षणी आईच्या


लहान मुलांसाठीं उत्कृष्ट औषध।

डोंगरे बालामृत

के. टी. डोंगरे अँण्ड कं. प्रा. लि. मुम्बई-४.

आठवणींने प्रवीण मोठमोठ्याने रडू लागला. आब्बाजाननी त्याला मायेनं जवळ घेतलं–त्याला कुरवाळीत ते गदगदलेल्या आवाजात म्हणाले, " बेटा ! ऐसे समयपर तुझे मांकी याद होना वैसे तो ठीक है–लेकिन हिम्मत छोडो मत. मांजी कहाँ भी हो तुम्हारे भलाईके लिये दुवा मांगती रहेगी–तुम्हे आशिर्वाद देती रहेगी "

प्रवीणला जास्तच रडू येत होतं. आब्बाजानचे ते शब्द अमृतासारखे गोड गोड असायचे.

" मांजीके शिवा और एक व्यक्ती मेरेलिये हमेशा दुवा मांगती होगी." प्रवीण त्यावेळी म्हणाला होता.

" और कोन बेटा ? तेरी बेहेन ?"

" जीं हाँ बेहेन तो मांगेगी–मेरे खयालमे दुसरी व्यक्ती है."

" कौन बेटा ?"

" मेरे आब्बाजान !"

हे शब्द ऐकल्यावर अब्बाजाननी प्रवीणला कडकडून मिठ्ठी मारली. ते रडत रडत गदगदलेल्या स्वरात म्हणाले–

" मेरे बेटे ! जुग जुग जियो ! फिर ये क्या ? मैभी रोता हूँ और तू भी–तुझे मिठाई कौन खिलायेगा ?" आणि खरोखरच लगेच आब्बाजाननी मिठाई आणून प्रवीणच्या तोंडात आपल्या हाताने घातली. घरच्या नोकराचाकरानाही " प्रवीण मुन्ना इंटर पास होगया " म्हणत म्हणत भरपूर मिठाई वाटली. केवढा आनंद झाला होता त्या दिवशी आब्बाजानना–हर्षभरात ते प्रवीणला म्हणालेदेखील–

" बेटे, हमे अब अकेले रहेना पडेगा–क्यो को तुझे अब डॉक्टर बनना है–कॉलेजके लिये कलकत्ता जाना पडेगा तुझे."

आब्बाजानच्या चेहऱ्यावर एक विलक्षण तेज त्यावेळी तळपत होते–आनंदाचे. अभिमानाचे.

तेव्हा प्रवीणला वाटले–आता कसला हा अभागी डॉक्टर बनतोय-अनाथ-पोरका !

त्याच्या चेहऱ्यावरचा हा भाव जणु काय ओळखून अब्बाजाननी त्याला पुनः जवळ घेऊन म्हटलं होत – " अभी तुम मुझे पराय समझते हो ? ऐसा नही चलेगा. तुम्हे डॉक्टर बननाही होगा. मै तुझे डॉक्टर बनाऊंगा. "

" आब्बाजान !" म्हणत प्रवीण त्याना अधिक बिलगला होता.

गाडी पुनः कुठल्याशा स्टेशनवर उभी होती – 'चाय गरम कॉफी गरम ' चा पुकारा ऐकू येत होता गाडीतल्या सहप्रवाशाने प्रवीणला विचारले – " आप चाय लेते नही ?"

" थॅंक यू – मेरी तबीयत ठीक नही है " प्रवीण कसंबसं म्हणाला. पुनः त्याचं मन गतकाळात घोटाळू लागलं.

आब्बाजाननी प्रवीणला मेडिकल कॉलेजमध्ये दाखल केलं. त्याला भरपूर कपडे-

स्त करून दिले. नवाकोर बिस्तरा घेऊन दिला. त्याला कसलीही ' तकलीफ ' होऊ नये म्हणून त्यांनी त्याला होस्टेलवरच ठेवल. दरमहा आब्बाजानची मनिऑर्डर बिनचूकपणे यायची. मधून मधून ते स्वतः येऊन त्याच्या खोलीवर एखादा दिवस राहून त्याला अभ्यासाला उत्तेजित करीत. प्रिन्सिपॉल रेक्टरला भेटून त्याच्यावर नजर ठेवावी म्हणून कळकळीची विनती करीत. येताना त्याच्यासाठी त्याला आवडणारी मिठाई आणीत. प्रवीणला राहून राहून आश्चर्य वाटायच – " कोणाचं कोण ? मागच्या जन्मीचा पिता तर नसावा हा ?" प्रवीणला भेटून ते परत गावी निघाले की आब्बाजानचे डोळे डबडबून जात. " बेटे ! तुम्हे आब्बाजानके लिये डॉक्टर बननाही होगा. स्टडीमे कसूर मत करना !"

दिवस गेले – वर्षे गेली – प्रवीण जात्याच हुषार विद्यार्थी. भराभर तो पास होत गेला – कॉलेजला सुट्टी पडली की तो आब्बाजानकडे यायचा. आब्बाजानना केवढा आनंद व्हायचा. रोज रोज निरनिराळी ' रसोई ' पकवायचे हुकूम सुटायचे. आब्बाजान प्रवीणला विश्राती मिळावी म्हणून मूर्तीपूरला त्यांच्या खेतवाडीच्या गावी घेऊन जायचे. तिथल्या नैसर्गिक वातावरणात तो रमून जायचा अन् आब्बाजानलाही आनंद व्हायचा.

प्रवीण डॉक्टर झाला. कॉलेजच्याच दवाखान्यात त्याला इन्टर्नशिप् मिळाली. आब्बाजानना कोण आनद झाला ! "मेरे लाडले बेटे" म्हणून त्याला पोटाशी धरून ते किती तरी वेळ घळघळ रडले. इन्टर्नशिप्चा पहिला पगार प्रवीणच्या हाती आल्यावर त्यानं आब्बाजानच्या नावावर मनिऑर्डर केली ती परत आली आणि पाठोपाठ आब्बाजान कलकत्त्याला आले. त्याला चागल खडसावून ते म्हणाले, " बेटा ! अभी तुम मुझे पराया समझते हो ? अब तेरी शादी होगी–मेरे लिये


## पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नांनंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणास त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकानी लाभ घेतलेला आहे, आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागापासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.

वेस्टर्न इंडिया कं. (वी. एन.) पो. कतरीसराय (गया)

बहूबटी आयेगी. तुझसे मै कुछ नही चाहता. मैने विल कर रख्खा है-मेरी सब जायदाद मेरे पश्चात तुम्हेही मिलेगी" आब्बाजान खिन्न नजरेनं त्याच्याकडं पाहात म्हणाले.

"आब्बाजान ! तुम सचमुच मेरे आब्बाजन हो" म्हणत प्रवीणने त्यांना कडकडून मिठ्ठी घातली होती. तो क्षण प्रवीणला आता प्रकर्षाने आठवला. तो भावनेचा क्षण त्याच्या मनाला फुलवीत होता-मन कसं समाधानी बनलं होतं. पण तेवढ्यात तेच आब्बाजान जखमी झाल्याचं त्याला आठवलं, त्यांच्या भेटीसाठी त्याचं आतुर मन तडफडू लागलं.

गाडी आता भरधाव पळत होती. प्रवीणचं मन पुन: वेगानं गत गोष्टीत डुंबून निघत होतं.

इन्टर्नशिप् संपल्यावर प्रवीणला मेडिकल ऑफिसरची नोकरी मिळाली. लता त्याच्या आयुष्यात आली-त्याचीच ती सहाध्यायी. आब्बाजानला हे कळलं-केवढा आनंद झाला त्यांना. 'बहुबेटी' म्हणत त्यानी लताचं तोंड भरून कौतुक केलं अन् लग्नसोहळा पार पाडला. लग्नात प्रवीणला आईची-मायाची आठवण झाली; पण आब्बाजानच्या डोळ्यांतील ते कौतुक-तो रास्त अभिमान-तो आनद पाहून प्रवीणचं दु:ख विरघळून गेलं. 'बहुबेटी' म्हणून आब्बाजाननी तोंड भरून लताला आशीर्वाद दिला.

प्र ीणचं सारं काही ठाकठीक झालं-तो नोकरीत-संसारात रमून गेला. आब्बाजान वरचेवर त्याच्याकडे येऊन त्याची अन वहूबेटीची मायेनं विचारपूस करीत. लतानंही ते मुसलमान आहेत असं कुठल्याही कृतीनं दाखविलं नाही. आशेचा जन्म झाला. तेव्हाही आब्बाजान हजर होतेच-"अरे मेरी शानदार मुन्नी" म्हणत त्यांनी आशेला आपल्या मांडीवर घेतलं. त्यांचे आनदाश्रु त्या अर्भकाच्या इवल्याशा अंगावर पडलेही. नवीन आंगड-टोपड सारी काही आब्बाजाननी घेऊन दिलं. प्रवीणला वाटायच आता आब्बाजाननी आपल्याकडेच राहावं. तर ते म्हणायचे, "अरे पगले ! तेरी जायदाद तब कौन देखेगा ? तू डॉक्टर-बहु डॉक्टर-खेतवाडीका क्या होगा ? तेरे खुषीमें मेरी खुषी बेटा ! बुढायेमें मुझे क्या लगता ? मेरी फिक्र करो मत बेटा !"

आब्बाजान वारंवार मूर्तीपूरला जाऊन खेतवाडीची देखभाल करून यायचे. गेल्या आठवड्यातच तिथं जातीय दंगल चालू झाली. प्रवीणनं 'तिकडं जाऊ नका' म्हणून पत्रातून परोपरीन विनविलं तरी आब्बाजान मूर्तीपूरला गेलेच-आणि...

सिव्हिल सर्जनची ती तार प्रवीणला आठवली-"आब्बाजान सीरियसली वुंडेड, स्टार्ट इमिजिएटली" प्रवीणचं मन सारखं तडफडू लागलं. केव्हा एकदाचं मूर्तीपूर येतं असं त्याला होऊन गेलं होतं. त्या भरधाव पळणाऱ्या गाडीचाही त्याला राग येत होता. तिनं आणखी पळावं असच त्याला वाटत होतं.

अखेर आलं एकदाचं मूर्तीपूर स्टेशन–गाडी पुरी थांबण्यापूर्वीच प्रवीणनं प्लॅट फॉर्मवर उडी टाकली. तिकीट कसंबसं चेकरच्या हा ी देऊन तो निसटला अन् रिक्षामधून सिव्हिल हॉस्पिटलकडं निघाला.

हॉस्पिटलच्या एका वॉर्डात आब्बाजानना पाहून त्याला हुंदका आवरेनासा झाला. आब्बाजानचं बहुतेक शरीर बँडेजमध्ये होत. फक्त उजवा हात मोकळा होता. डाव्या हातांच्या शिरेतून सलाईन चालू होतं. पिंडरीला टोचलेल्या सुईमधून रक्त चालू होतं.

"आब्बाजान!" प्रवीणनं रडक्या आवाजात हाक मारली. ते शुद्धीवर नव्हतेच. तो मुसमुसून रडू लागला. इंजेक्शन देणाऱ्या नर्सनं त्याचं सांत्वन केलं. पोरासारखा तो हुंदके देऊन रडत होता.

ती रात्र तशी गेली. प्रवीण आब्बाजानच्या शेजारी सारखा बसून होता. त्याला तहानभूक आठवत नव्हती. पहाटे पहाटे आब्बाजान थोड शुद्धीवर आल्याप्रमाणे वाटले, त्यांनी डोळे उघडले–

"आब्बाजान! मैं आया हूँ" प्रवीण रडत रडत म्हणाला आब्बाजानांचा आवाज खोल गेला होता. प्रवीणनं आपलं तोंड त्यांचा तोंडाजवळ नेलं–

"तु ऽऽम आ ऽऽये बे ऽऽटे–ब ऽऽहु–मु–न्नी" दुरून दरीतून आवाज निघावा तसे आब्बाजानांच्या तोंडातून तुटक तुटक शब्द बाहेर पडत होते.

"सब अच्छे है आब्बाजान!" प्रवीण चटकन म्हणाला.


आब्बाजाननी आपला उजवा हात थोडासा उचलला–प्रवीणणं आपलं तोंड अधिक जवळ नेलं.

"मे ऽऽरे बे ऽऽटे" म्हणत आब्बाजाननी त्याच्या कपाळावर ओठ टेकले. तोच त्यांना एक आचका आला–तोंडातून रक्ताची गुळणी बाहेर पडली अन् सारा कारभार आटोपला.

"आब्बाजान!" म्हणून मोठ्याने ओरडत प्रवीण त्यांच्या छातीवर पडून रडू लागला.

दूर कुठे तरी त्या पहाटेच्या वेळीही "काटो–मारो"चा आरडा घुमत होता.





आपणही
आपला पैसा
खर्च करा
अन् ह्यातभर
निश्चिंत व्हा!
एसीसी
आपल्या
पुढीलपैकी
स्वरूपाची
करू शकाल
★ सहा गव्हाणीसह गुरांसाठी
५ मीटर × ३ मीटर लांबीरुंदीचा
★ सभोवताली ५ मीटरचा चौरस
ओटा असलेला ३ मीटर × १ मीटरचा
पाण्याचा हौद
★ खतासाठी ३ मीटर × २.५ मीटरचे
चार खड्डे
★ आणि गटारासह
मीटरचा गोठा
★ कुंपणासाठी प्रीकास्ट
११५ खांब
सिमेंटची बांधकामे अधिक टिकाऊ, अधिक आरोग्यप्रद असतात, ती सहज स्वच्छ करता येतात. आपली बांधकामे एसीसी सिमेंटने करा. गेल्या ५० हून अधिक वर्षांपासून एसीसी सर्वोत्कृष्ट दर्जाचे सिमेंट तयार करीत आली आहे.
तुम्हाला लागणारे सिमेंट तुमच्या नजीकच्या एसीसी स्टॉकिस्टकडून किंवा दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड, १२१, महर्षि कर्वे रोड, मुंबई-२०, यांच्याकडून खरेदी करा.
दि कॉंक्रीट असोसिएशन ऑफ इंडिया, १२१ महर्षि कर्वे रोड, मुंबई-२० यांच्याकडून तुम्हाला तांत्रिक साह्य विनामूल्य मिळू शकेल.
दि असोसिएटेड सिमेंट कंपनीज लिमिटेड
दि सिमेंट मार्केटिंग कंपनी ऑफ इंडिया लिमिटेड
★ १.५ मीटर
ACC

# पराजित-अपराजित

वि. स. वाळिंबे

तसे घडणे अगदी स्वाभाविक होते.

किंबहुना तिसरे प्रजासत्ताक इतकी वर्षे टिकले हेच एक आश्चर्य म्हटले पाहिजे. कारण ते जन्माला आले तेच मुळी वादळी परिस्थितीत आणि पुढेही या वातावरणात फारशी सुधारणा कधी झालीच नाही.

फ्रान्समध्ये राज्यक्रांती झाली १७८९ मध्ये आणि तेव्हापासून त्या देशाचे सत्ताकेंद्र सतत अस्थिरतेच्या भोवऱ्यात गिरक्या घेत होते. अवघ्या ऐंशी वर्षांच्या कालखंडामध्ये फ्रान्सने किती वेगवेगळ्या राजवटींची चव चाखली हे ध्यानात घेतले की फ्रेंच नागरिकांच्या अस्थिर मन:स्थितीची चांगली कल्पना येते.

राज्यक्रांतीचा आगडोंब उसळताच त्यात बोर्बोन राजघराण्यातील सोळाव्या लुईची आहुती पडली. ही घटना अतिशय महत्त्वाची होती. कारण फ्रान्सने प्रथमच राजसत्ता भिरकावून दिली होती. १७९२ मध्ये पहिल्या प्रजासत्ताकाची घोषणा झाली. परंतु ते नावाचेच प्रजासत्ताक होते. कारण लोकांना काय हवे आहे याची राज्यक्रांतीच्या सूत्रधारांना फिकीर नव्हती. राज्यक्रांतीचे निमित्त साधून वैयक्तिक सूडाचे हिशोब चुकते केले जात होते. सारी सत्ता आपल्या एकट्याच्या हाती यायला पाहिजे या पिपासेने धुंद झालेल्या रोबेस्पीएर्‌ने, जुलमी सम्राटांनाही मागे टाकील असा नरमेध आरंभिला. तीन एक वर्षे पॅरिसची भूमी रक्ताने न्हाऊन निघाली. शेवटी या अग्निकुंडाने खुद्द रोबेसपीएर्‌चा बळी पडला तेव्हा कोठे घटनात्मक प्रजासत्ताकाची द्वाही फिरली.

या प्रजासत्ताकाचा फर्स्ट कॉन्सल म्हणून १७९९ मध्ये नेपोलियन बोनापार्टची नेमणूक झाली. या महत्त्वाकांक्षी माणसाने एक दिवस या दुबळ्या प्रजासत्ताकावर लाथ मारली आणि स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला. नेपोलियनच्या तलवारीने

जनरल, ती वेळ मघाशीच निघून गेली आहे.
आता सारं काही संपलेले आहे.
तुम्ही पुन्हा मार्गारेटकडे जावं हेच बरं....

एका भीषण नाट्याचे
विदुषकी प्रयोगात रूपांतर झाले होते....

## दोन

दहा वर्षे साऱ्या युरोपला चळचळा कापायला लावले. परंतु नंतर तोही नियतीचा भक्ष्य बनला.

बोर्बोन घराणे पुन्हा सिंहासनावर विराजमान झाले. परंतु पहिली परिस्थिती आता राहिलेली नाही याची अठराव्या लुईला आणि दहाव्या चार्लसला जाण आली नाही. त्यामुळे ओर्लिअन्स येथल्या लुई-फिलीपने सिंहासनाचा कबजा घेतला. ही घटना अठराशे तीसमध्ये घडली. त्यानंतर अठरा वर्षांनी हा लुई-फिलीप्सही कोसळला आणि दुसरे प्रजासत्ताक अस्तित्वात आले.

पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती झाली.

या प्रजासत्ताकाच्या अध्यक्षपदी निवडून आलेल्या लुई-नेपोलियनने चार वर्षांच्या आतच प्रजासत्ताकाची घटना गुंडाळून ठेवली आणि सम्राट तिसरा नेपोलियन म्हणून तो राजसिंहासनावर आरूढ झाला. येथपर्यंत लुई-नेपोलियनने आपल्या चुलत्याचे म्हणजे पहिल्या नेपोलियनचे अचूक अनुकरण केले. परंतु चुलत्याची कर्तबगारी त्याच्या अंगात नव्हती. त्याचा परिणाम असा झाला की १८७० मध्ये प्रशियाने फ्रान्सवर धडक मारताच तिसऱ्या नेपोलियनचा राजमुकूट निखळून पडला. सेडान येथे २ सप्टेंबर १८७० रोजी त्याने शरणागतीच्या कागदावर स्वाक्षरी करताच प्रशियन सेनानीने त्याला कैद केले.

यावेळी फ्रान्समधील लोकमत दुभंगलेले होते.

पॅरिसमधील राजकीय कार्यकर्त्यांना प्रजासत्ताकाचा ध्यास लागलेला होता तर पॅरिसबाहेरील बहुसंख्य जनसमुदाय राजसत्ताच बरी अशा मताचा होता. ठिक-ठिकाणचे सरदार-दरकदार आणि परंपराप्रिय धर्मोपदेशक राजसत्तेचे पुरस्कर्ते होते. सैन्यात मात्र या प्रश्नाबाबत दोन गट पडले होते. त्यामुळे, तिसरा नेपोलियन

शत्रूच्या हाती सापडला तेव्हा फ्रान्समधील गोंधळ शिगेला पोचला होता.

ही संधी साधून लिऑं गांबेत्ता याने तिसऱ्या प्रजासत्ताकाची घोषणा केली. गांबेत्ता पॅरिसमधल्या क्रांतिकारक-गटाचा म्होरक्या होता. आपल्या पाठीशी क्रांति-सैनिक असल्यामुळे आपल्याला विरोध करण्याची कोणालाही हिंमत होणार नाही अशी त्याची अपेक्षा होती. परंतु जनमताचा कल लक्षात घेता ही अपेक्षा सहजा-सहजी सफल होणे कठिण होते.

गांबेत्ता याने प्रजासत्ताकाची घोषणा केल्यानंतर फ्रान्समध्ये सार्वत्रिक निवडणुका झाल्या. निवडणूक घेण्यात आल्यामुळे प्रजासत्ताक स्थिरस्थावर होईल असे गांबेत्ता याला वाटले. परंतु आश्चर्याची गोष्ट अशी की संसदेमध्ये निवडून आलेल्या साडे-सहाशे लोकप्रतिनिधींपैकी जवळ जवळ चारशे जणाना फ्रान्समध्ये पुनरपि राज्य-सत्ताच प्रस्थापित व्हायला हवी होती.

गांबेत्ता याने जाहीर केलेले प्रजासत्ताक कोसळण्याचीच बहुसंख्य लोकप्रतिनिधी वाट पहात होते.

राजसत्ता प्रस्थापित व्हावी याबाबत या लोकप्रतिनिधींमध्ये एकमत असले तरी सिंहासनावर कोणाला बसवायचे हा पराकाष्ठेच्या मतभेदाचा विषय होता. बोर्बोन घराण्याचा कायदेशीर वारस असलेला कॉन्त द शाबो यालाच अभिषेक करण्यात आला पाहिजे असा एका गटाचा आग्रह होता तर काहीजण कॉन्त द पारी याच्या बाजूचे होते. तो लुई-फिलीपचा नातू होता. याशिवाय आणखी एक गट होता. नेपोलियनच्या वारसाला पाचारण करण्यात यावे असे या गटाला वाटत होते. इतर दोन गटांच्या तुलनेने हा गट मात्र बराच कमजोर होता.

तीन गटांची तोंडे तीन दिशाना आहेत हे पाहून हंगामी प्रजासत्ताकाचा अध्यक्ष अॅडॉल्फ थिएर्स लोकप्रतिनिधींना म्हणाला, ' मित्रानो, आपल्यापाशी एकच सिंहासन आहे. त्यामुळे तिघांची काही सोय करता येणार नाही. '

माघार घ्यायला कोणताच गट तयार नव्हता. त्यामुळे प्रजासत्ताकाला आपोआप जीवदान मिळत होते.

तिसऱ्या प्रजासत्ताकाचा जन्म हा फ्रान्सच्या इतिहासातील एक अपघात मानला जातो तो यामुळेच.

शांबो आणि पारी या दोन वारसदारांपैकी कोणाला राजपद द्यायचे हा वाद दोन वर्षे चालू होता. शेवटी तडजोड म्हणून असे ठरले की या दोघांमध्ये शांबो वयस्कर असल्यामुळे त्याला प्रथम राज्याभिषेक करावा आणि त्याला संतती नसल्या-मुळे शांबोच्या निधनानंतर सिंहासनाचा वारसा कांत द पारी याच्याकडे द्यावा. यावेळी शांबोने निराळेच खुसपट काढले. फ्रान्सचा तिरंगी राष्ट्रध्वज राज्यक्रांतीचा प्रतीक असल्यामुळे तो बदलण्यात आला पाहिजे असा त्याने हट्ट धरला. तो

म्हणाला, 'क्रांतीचा वारसा चालविण्याची माझी बिलकूल इच्छा नाही आणि म्हणून तुम्ही राष्ट्रध्वज बदलत असाल तरच मी सिंहासनाचा स्वीकार करतो.'

शांबोच्या पाठीराख्यांनादेखील ही अट मजूर झाली नाही. राज्यक्रांतीची ही आठवण पुसून टाकायला जनता कसून विरोध करील हे त्यांना पक्के माहित होते. म्हणून 'आपण आपली ही अट मागे घ्यावी' अशी शाबोला त्याच्या पाठीराख्यांनी विनती करताच तो फिसकारला, 'राजपद मिळविण्यासाठी नमतं घ्यायची माझी तयारी नाही. माझ्या अटीसह तुम्हाला माझा स्वीकार करावा लागेल. एरवी नाही."

त्याचे हे उद्‌गार ऐकल्यानंतर, राजसत्ता हवी असे मानणारे लोकही म्हणू लागले, 'बस्स झाली ही खुषामत. आता आम्हाला एखादा बोर्बोनही नको आणि बोनापार्टही नको. आमच प्रजासत्ताक आहे ते चागलं आहे.'

म्हणजे, एका अर्थानें हट्टी शाबोच प्रजासत्ताकाचा जनक ठरतो. थिएर्सने म्हटले आहे–'इतिहास शांबोचा उल्लेख फ्रान्सचा वॉशिंग्टन असाच करील.'

राजसत्तेचा प्रश्न बाजूला पडल्यामुळे, प्रजासत्ताकाची राज्यघटना तयार कर॰ण्याच्या कार्याला गती मिळाली. त्यासाठी ससदेने तीस जणाची समिती नेमली होती. या समितीने घटनेचे अनेक मसुदे तयार केले. परतु संसदेला कोणताच मसुदा पसत पडेना.

१८७५ चा जानेवारी उजाडला.

ससदेची मुदत संपत आली होती. संसदेचे विसर्जन होण्याच्या अगोदर राज्य॰घटना निश्चित करण्यात आली नाही तर देशात अराजक पेटेल हे बऱ्याच ससद॰सदस्यांना जाणवले. लोकांनाही या अस्वस्थ परिस्थितीचा कटाळा आला होता. 'काय करायचे आहे ते लवकर करा' असे त्याचे म्हणण होते. प्रजासत्ताक अजून कोणताच आकार घेत नाही हे पाहून राजनिष्ठ गटाच्या कारवाया सुरू झाल्या. कोणी बोर्बोनला आमत्रण देत होते तर कोणी बोनापार्टचा वारस शोधत होते. प्रत्यक्षात काय घडणार आहे याचा कोणालाच अदाज येत नव्हता. मध्यतरीच्या काळात मार्शल मॅकमॅहॉन आणि जनरल सिसे हे दोन सेनानी अनुक्रमे राष्ट्राध्यक्षाच्या आणि प्रधानमत्र्याच्या आसनावर आरूढ झालेले होते. ते दोघेजण लष्कराच्या मदतीने सत्ता आपल्या हातात घेण्याचा प्रयत्न करणार असल्याच्या वावड्याही उठत होत्या.

आणि तरीही संसदेमध्ये राज्यघटनेसबंधीचा घोळ चालूच होता.

अशा या अकार्यक्षम ससदेच्या दृष्टीने तीस जानेवारी हा दिवस अतिशय महत्त्वाचा ठरला. आदल्या दिवशी लावालये नावाच्या सदस्याने राज्यघटनेसबधी एका वाक्याचा प्रस्ताव मांडला –'ससदेची दोन सभागृहे आणि दोन अध्यक्ष असे प्रजासत्ताकाच्या सरकारचे स्वरूप असावे.' हा प्रस्ताव तीनशे एकोणसाठ विरुद्ध

तीनशे छत्तीस मतांनी फेटाळण्यात आला. म्हणजे प्रजासत्ताक-स्वरूपाचे सरकार नसावे असे बहुमताचे म्हणणे होते. परंतु दुसऱ्या दिवशी वालों नावाच्या सदस्याने आणखी एक प्रस्ताव मांडला. तो असा होता—' संसदेच्या सिनेट आणि प्रतिनिधि-सभा या दोन सभागृहांच्या संयुक्त बैठकीमध्ये प्रजासत्ताकाच्या अध्यक्षाची निवड व्हावी. अध्यक्षपदाची मुदत सात वर्षांची असावी आणि अध्यक्षाला फेरनिवडणुकी-साठी उभे राहण्याची मुभा असावी.' म्हणजे या प्रस्तावात नवीन असे काहीही नव्हते. या प्रस्तावावर प्रारंभी इतकी कडाक्याची चर्चा झाली की हा प्रस्ताव मांडण्याची आपल्याला कोठून दुर्बुद्धी सुचली असे वालों याला झाले. त्याबद्दल त्याने सभागृहापुढे दिलगिरीही व्यक्त केली. तरीही हा प्रस्ताव मताला टाकण्यात आला आणि गमतीची गोष्ट अशी की एक मत अधिक पडून तो संमत झाला. तीनशे त्रेपन्न विरुद्ध तीनशे बावन्न असे मतदान झाले.

म्हणजे कोणाच्याही ध्यानीमनी नसताना प्रजासत्ताकावर लोकप्रतिनिधींच्या मान्यतेचे शिक्कामोर्तब झाले.

वालों याचा प्रस्ताव संमत झाल्यानंतर राज्यघटनेचा तपशील निश्चित करायला त्या मानाने फारसा वेळ लागला नाही. तीनशे सदस्यांचे सिनेट आणि सहाशे अठरा सदस्यांची प्रतिनिधिसभा असे संसदेचे स्वरूप ठरले. त्याचप्रमाणे संसदेमध्ये बहुमत प्राप्त झालेल्या पक्षाच्या नेत्याला राष्ट्राध्यक्षाने पाचारण करून मंत्रिमंडळ बनविण्यास सांगावे आणि या मंत्रिमंडळामार्फत कारभार पहावा; परंतु सिनेटची मंजुरी घेऊन मंत्रिमंडळ बडतर्फ करण्याचा आणि प्रतिनिधिसभा विसर्जित करण्याचा राष्ट्राध्यक्षाला अधिकार असावा असेही यावेळी ठरले.

आणीबाणीच्या परिस्थितीमध्ये राष्ट्राध्यक्षाला सर्वाधिकार देण्याच्या सूचनेला राजनिष्ठांनी पाठिंबा दिला त्यामागे त्यांचा अंतस्थ हेतु होता. अशा या सर्वाधिकारी राष्ट्राध्यक्षपदाचे आपल्याला केव्हाही राजसिंहासनामध्ये रूपांतर करता येईल असे त्यांना वाटत होते. काहीही का असेना, फ्रेंच संसदेने प्रजासत्ताकाची राज्यघटना निश्चित केली आणि त्यानुसार १८७६ च्या प्रारंभी सिनेट आणि प्रतिनिधिसभा यांच्या निवडणुका झाल्या. सिनेटची निवडणूक अप्रत्यक्ष पद्धतीने म्हणजे ठिक-ठिकाणच्या जिल्हा-मंडळांकडून झाली तर प्रतिनिधिसभेच्या निवडणुकीसाठी प्रत्येक पुरुषाला मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. (१९४५ पर्यंत फ्रान्स-मध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार नव्हता.) त्याचा परिणाम असा झाला की सिनेटमध्ये राजनिष्ठांचे तर प्रतिनिधिसभेमध्ये प्रजासत्ताकवाद्यांचे बहुमत झाले. प्रधानमंत्री अर्थातच प्रतिनिधिसभेतून निवडावयाचा होता. गाँबेत्ता याच्या धारदार वक्तृत्वामुळेच प्रजासत्ताकवाद्यांना प्रतिनिधिसभेत बहुमत मिळालेले असल्यामुळे, मंत्रिमंडळ बनविण्यासाठी त्याला राष्ट्राध्यक्ष मॅकमॅहान याच्याकडून बोलावणे येईल अशी सर्वांची कल्पना होती.

परंतु मॅकमॅहॉनसारख्या जीर्णमतवादी राष्ट्राध्यक्षाला गाबेत्तासारखा जहाल मताचा प्रधानमंत्री परवडण्यासारखा नव्हता. जो त्याच्या तंत्राने वागेल असाच माणूस त्याला हवा होता. म्हणून त्याने द्युफोर नावाच्या मवाळ प्रकृतीच्या सदस्याला प्रधानमंत्री नेमले. परंतु तो अगदीच निष्प्रभ ठरल्यामुळे मॅकमॅहॉन याने द्युफोरच्या जागी ज्युल्स सिमाँ याची नमणूक केली.

सिमाँ मॅकमॅहॉनच्या तंत्राने वागेना; म्हणून मॅकमॅहॉनने त्याला १६ मे १८७७ रोजी एक खरमरीत पत्र पाठवले. त्या पत्रातील उद्दाम भाषा वाचताच सिमाँ याने प्रधानमंत्रिपदाचे त्यागपत्र मॅकमॅहॉनकडे धाडून दिले. सिमाँ याला समज देण्यासाठी जे पत्र धाडले होते त्यामुळे सिमाँ त्यागपत्र देईल अशी मॅकमॅहॉन याला कल्पना नव्हती. त्याच्या अपेक्षेपेक्षा वेगळेच काही तरी घडले होते आणि त्यामुळे नवजात प्रजासत्ताकाला एका अनपेक्षित पेचप्रसंगाला तोंड द्यावे लागणार होते.

मॅकमॅहॉनभोवती प्रारंभापासूनच राजनिष्ठांचा गराडा पडलेला होता. त्यामुळे सिमाँ याने त्यागपत्र धाडताच, राजनिष्ठाच्या सागण्यावरून मॅकमॅहॉन याने ड्युक द ब्रोग्ली या उमरावाला प्रधानमंत्री नेमले, आणि येथेच त्याची गफलत झाली. ब्रोग्ली लोकांचा प्रतिनिधी नसल्यामुळे आपण त्याला प्रधानमंत्री मानायला तयार नाही असा प्रतिनिधिसभेने ठराव केला. म्हणजे मॅकमॅहॉनचा डाव त्याच्यावरच उलटला. अशा परिस्थितीत प्रतिनिधिसभा विसर्जित करून, नव्या निवडणुका घेण्यावाचून मॅकमॅहॉनला गत्यंतर नव्हते.

त्याप्रमाणे प्रतिनिधिसभेच्या फेरनिवडणुका झाल्या आणि यावेळीही प्रजासत्ताकवाद्यांनाच बहुमत मिळाले. लोकमताचा कौल विरुद्ध जाऊनही मॅकमॅहॉन डगमगला नाहीं. प्रतिनिधिसभेला खिजविण्यासाठी त्याने एका सेनापतीला प्रधानमंत्री केले. त्यामुळे प्रतिनिधिसभा अधिकच प्रक्षुब्ध झाली.

राष्ट्राध्यक्ष आणि प्रतिनिधिसभा याच्यात वादंग निर्माण झाल्याचे पाहून राजनिष्ठांनी उठाव करण्याचा बेत आखला. मॅकमॅहॉन आपल्या पाठीशी उभा राहील अशी राजनिष्ठांची कल्पना होती. मॅकमॅहॉन जीर्णमतवादी असला तरी प्रामाणिक होता. लोकप्रतिनिधीशी दगलबाजी करायला तो तयार झाला नाही. यावेळी तो प्रजासत्ताकाच्या बाजूने उभा राहिला. राजनिष्ठानी लष्करी उठाव केला तर तो मोडून काढता यावा म्हणून मॅकमॅहॉनने प्रतिनिधिसभेला पसत असलेल्या व्यक्तीची प्रधानमत्रिपदावर नेमणूक केली. १८७९ मध्ये जिल्हा–मंडळाच्या निवडणुका झाल्या तेव्हा त्यात प्रजासत्ताकवाद्यांची सरशी झाली. त्यामुळे आपोआपच सिनेटमध्यही त्यांचे बहुमत झाले.

सिनेट आपल्या हातातून गेली आहे असे आढळून येताच मॅकमॅहॉनने त्यागपत्र दिले. त्याच्या जागी आलेला ज्युल्स ग्रेव्ही हा कट्टर प्रजासत्ताकवादी होता.

मॅकमॅहॉनच्या निवृत्तीमुळे तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या मार्गातील एक मोठाच अडसर दूर झाला.

ज्याप्रमाणे वाईटातून चागले निघते त्याप्रमाणे कधीकधी चांगल्यातुन वाईट निघते. मॅकमॅहॉनच्या त्यागपत्रामुळे नेमके तसे घडले.

फ्रेंच राज्यघटनेने संसद आणि राष्ट्राध्यक्ष याच्यामध्ये अधिकारांचा समतोल साधलेला आहे. दोघांपैकी कोणताही एक घटक वरचढ होऊ नये यासाठीच ही तरतूद करण्यात आलेली आहे. परतु, मॅकमॅहॉनचा अनुभव लक्षात घेऊन त्याच्या-नतर अधिकारावर आलेल्या कोणत्याही राष्ट्राध्यक्षाने प्रतिनिधिसभा विसर्जित करण्याचे धाडस दाखविले नाही. त्यामुळे प्रतिनिधिसभेचा वरचष्मा आपोआप वाढत गेला. याचा परिणाम असा झाला की लोकप्रतिनिधी बेजबाबदार रीतीने वागू लागले.

राष्ट्राध्यक्ष नामधारी प्रमुख म्हणून वावरू लागला. त्यामुळे मंत्रिमंडळांचे भवितव्य प्रतिनिधिसभेच्या मेहेरबानीवर अवलबून राहू लागले. एकदा निवडून आल्यानंतर चार वर्षे आपल्याला कोणीही हात लावू शकत नाही याबद्दल निःशंक असलेले लोकप्रतिनिधी आपल्या पक्षालाही जुमानीनासे झाले. मतदारांचे आणि आपले काही नाते आहे याचीही जाणीव उरली नाही. या अशा परिस्थितीत जे व्हायचे तेच झाले. लहानलहान पक्षांचे पेव फुटले. त्यामुळे प्रतिनिधिसभेमध्ये कोणत्याच पक्षाला बहुमत लाभेना. सहा–सहा महिन्यांनी मत्रिमंडळे बरखास्त होऊ लागली. तात्पुरत्या स्वार्थासाठी काही पक्ष एकत्र यायचे, मंत्रिमंडळ बनविताना संबंधितां-मध्ये मत्रिपदाचे वाटप व्हायचे, पुन्हा कुरबुरी सुरू व्हायच्या, या कुरबुरीमुळे पावसाळ्यातील छत्र्याप्रमाणे उगविलेल्या सयुक्त आघाड्या फुटायच्या आणि त्याच्या या धुमश्चक्रीमध्ये मत्रिमडळाचा चक्काचूर व्हायचा हा जणू काही नियमच ठरला. काही वेळा तर असेही घडलेले आहे की प्रधानमत्री बदलला जायचा, परंतु इतर मंत्री तेच कायम असायचे. म्हणजे आपण आपल्या पक्षाला वा मतदारांना बाधलेलो आहोत याचे लोकप्रतिनिधीना भानच उरलेले नव्हते.

मत्रिमडळ बनविणे आणि मोडणे हा राजकारणी मंडळींचा एक नित्याचा खेळ झाला होता.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस जी औद्योगिक क्रांती झाली तिच्यामुळे युरोपमधील आर्थिक आणि सामाजिक परिस्थिती पार बदलून गेली. या बदलाचे स्वरूप इतके मूलगामी होते की त्याची दखल घेणे प्रत्येक देशातील राज्यकर्त्यांना भाग पडले. परतु सत्ता–स्पर्धेच्या राजकारणात दग झाल्यामुळे फ्रान्सच्या राज्य-कर्त्यांचे तिकडे साफ दुर्लक्ष झाले. नव्या काळाचे आव्हान स्वीकारायला फ्रान्स त्यावेळी असमर्थ ठरला त्यामागे हे कारण आहे.

आज आपल्या नेत्यांकडून लोकशाहीची विटंबना होत आहे आणि ती अखेरीस आपल्यालाच महाग पडणार आहे याचा त्यावेळी फ्रेंच जनतेला अंदाज आला नाही. राजनिष्ठांचा पराभव होऊन प्रजासत्ताक स्थिरपद होत आहे याच आनंदात ते मश्गुल होते.

लोकशाहीतील अंतर्विरोध म्हणतात तो हा.

या अंतर्विरोधापायीच फ्रान्समध्ये निखळ सत्ताकांक्षी राजकारणाला तेजी आलेली होती.

अशा वातावरणामध्ये जनरल जॉर्ज बुलांजे याची १८८६ च्या जानेवारीमध्ये युद्धमंत्री म्हणून नेमणूक करण्यात आली. क्रिमिया, उत्तर आफ्रिका आणि इंडोचीन येथे झालेल्या युद्धांमध्ये या सेनानीने मर्दुमकी गाजविली होती. प्रशियाशी लढताना ही त्याने आपल्या रणकौशल्याचे दर्शन घडविले होते. त्यातून तो प्रजासत्ताकाचा पुरस्कर्ता होता. सैन्यातील अनेक दुय्यम अधिकारी अद्यापही राजनिष्ठांच्या पक्षाचे आहेत आणि त्यामुळे त्यांचा बीमोड करण्यासाठी एखादा कणखर सेनानीच युद्धमंत्रिपदावर हवा असे प्रधानमंत्री फ्रेसिने याला वाटत होते. जॉर्ज क्लेमेन्सो याच्यासारख्या जहालमतवादी गटाच्या नेत्यानेच जेव्हा बुलांजेचे नाव सुचविले तेव्हा फ्रेसिनेला आणखी विचार करण्याची गरज भासली नाही. त्याने बुलांजे याच्याकडे युद्धखाते सोपविले.

युद्धमंत्रिपदावर आरूढ होताच बुलांजे याने लष्कराच्या आमूलाग्र फेररचनेला प्रारंभ केला. प्रथम त्याने राजनिष्ठ सेनाधिकाऱ्यांना काढून टाकले. नंतर सैनिकांच्या पगारात आणि सुखसोयीत वाढ केली. त्यामुळे सैन्यातील असंतोष दूर झाला. बुलांजे याने सैनिकांना शिस्तीचे महत्त्व पटवून दिले. नवी शस्त्रास्त्रे खरेदी करून त्यांचा वापर कसा करायचा यासाठी अभ्यासवर्ग सुरू केले.

बुलांजे जसा आपल्या कामात वाकबगार होता तसे प्रसिद्धीचे तंत्रही त्याला अवगत होते. उद्या जर पुन्हा प्रशियाशी युद्ध जुंपले तर त्यावेळी आपले लष्कर सर्व दृष्टींनी सुसज्ज ठेवण्यासाठी आपण जिवाचा आटापिटा करीत आहोत याचा लोकांत बोलबाला होईल याकडे त्याचे लक्ष होते. बुलांजे याने राजनिष्ठ अधिकाऱ्यांना हाकलून दिल्यामुळे तर लोक त्याच्यावर बेहद्द खूष होते.

राज्यक्रांतीचे रणशिंग फुंकल्याचा दिवस म्हणून चौदा जुलै या दिवसाला फरान्सच्या इतिहासामध्ये महत्त्व आहे. त्यादिवशी बास्तीय येथील तुरुंग फोडण्यात आला म्हणून हा दिवस 'बास्तीय दिन' म्हणून ओळखला जातो. त्या दिवसाचे निमित्त साधून, लोकांना आपल्या कर्तृत्वाचे प्रत्यक्ष दर्शन घडावे या हेतूने बुलांजे याने भव्य लष्करी संचलन आयोजित केले. ते संचलन पाहण्यासाठी रस्त्याच्या दोन्ही बाजूंना नागरिकांनी दाटी केली होती. त्यावेळचा लष्कराचा दिमाख पाहून फ्रेंच नागरिकांना कमालीचा आनंद झाला. या संचलनाच्या वेळी लोकांचे लक्ष

आपल्यावर केंद्रित होईल या खुबीने बुलांजे या संचलनाचे नेतृत्व करीत होता. त्यामुळे तो दिसताच प्रेक्षक टाळ्यांचा कडकडाट करीत होते. या एका संचलनाने बुलांजे याचे उद्दिष्ट सफल झाले. लोकांना तो आपला तारणहार वाटू लागला.

सावध राज्यकर्त्यांनी अस्वस्थ व्हावे अशी ही घटना होती.

एका सेनानीचा एवढा गौरव व्हावा याचा आता क्लेमेन्सो यालाही त्रास होऊ लागला. लोकप्रियतेच्या लाटेवर आरूढ झालेला सेनानी सिंहासन केव्हा ताब्यात घेतो हे कळतही नाही हा जुना अनुभव प्रजासत्ताकवाद्यांना नेहमीच भयभीत करीत होता. त्यामुळे तर बुलांजेसंबंधी सर्वांना धास्ती वाटू लागली.

नेमक्या त्याच कारणासाठी राजनिष्ठांना बुलांजे जवळ करावासा वाटला. १८७० च्या पराभवाचे उट्टे काढण्यासाठी धडपडणारा नेता अशी बुलांजे याची प्रतिमा निर्माण होणे त्यांच्या सोयीचे होते. राजनिष्ठगट बुलांजेचा जयजयकार करू लागल्याचे आढळून येताच प्रजासत्ताकवादी नेते अधिकच चिंताक्रांत झाले. पण बुलांजे याला आता या विरोधाची पर्वा नव्हती.

लोकप्रियतेचा कैफ चढलेला माणूस जसा वागतो तसाच बुलांजे वागू लागला. त्याला युद्धमंत्रिपद देणाऱ्या संसदेवरच तो उलटला.

प्रतिनिधिसभा विसर्जित करून राज्यघटना बदलून घेण्याची त्याने राष्ट्राध्यक्षा-कडे मागणी केली. सध्याच्या परिस्थितीत देशाची सूत्रे एका समर्थ सेनानीच्या हाती सोपविणेच किती अपरिहार्य आहे हे तो लोकांना पटवून देऊ लागला.

याचा अर्थ स्पष्ट होता.

एखाद्या हुकूमशहासारखे आपल्याला महत्त्व प्राप्त झाले पाहिजे असे त्याच्या मनाने घेतले होते.

फ्रान्समधील राजकीय गोंधळ त्यावेळी इतका पराकोटीला गेला होता की बुलांजे याच्या या मागणीचा बऱ्याच जहालमतवादी आणि समाजवादी लोकप्रतिनिधींनीही पाठपुरावा केला. बुलांजे प्रजासत्ताकाच्या मुळावर येऊ पहात आहे हे लोकशाहीचा आणि समाजवादाचा घोष करणाऱ्या या कार्यकर्त्यांना उमगलेच नाही.

प्रधानमंत्री फ्रेसिने त्यामानाने सावध होता. बुलांजे याला युद्धमंत्रिपदावरून दूर करणे सोपे नाही हे कळून येताच फ्रेसिने याने १८८७ च्या मेमध्ये आपल्या मंत्रि-मंडळाचे त्यागपत्र देऊन टाकले. त्यामुळे बुलांजे आपोआपच मंत्रिमंडळातून बाहेर पडला. त्याचा आता पॅरिसमध्ये उपद्रव व्हायला नको म्हणून त्याला सीमेवर कोठे तरी सेनानी म्हणून पाठवावे असे फ्रेसिने याने राष्ट्राध्यक्षाला सुचविले. फ्रेसिनेनंतर प्रधानमंत्रिपद स्वीकारलेल्या चार्लस् फ्लोके यालाही ही सूचना पसत पडली.


परंतु सेनानीची लोकप्रियता आणि लोकांचे मानसशास्त्र याची प्रजासत्ताकवाद्यांना कल्पना नव्हती.

भारतात पहिल्यानेच!

नव्या भिंतींसाठी
नवा पेण्ट –

# डेकोप्लास्ट

नव्या प्लॅस्टरवरही प्रायमरशिवाय
लावता येतो.
उन्हापावसात
वर्षानुवर्षे
टिकून
राहतो.




सिमेंट पेण्टशी
तुलना केल्यास:

- मजुरीचा खर्च ४०% कमी!
- रंगकामाच्या ७ क्रियांऐवजी दोनच पुरेत!
- पाचपट जास्त भाग रंगविता येतो!

डेकोप्लास्ट बेस व्हाइटमध्ये
मॅजिकटच मिसळून ४० मनपसंत
रंगछटा झटपट तयार करता येतात.
शिवाय ५ पक्के, गर्द रंग
तयारच मिळतात.

जीवनातील रंगसंगती म्हणजेच **एशियन पेण्टस्**

AIYAR'S-A-30 MAR

प्रजासत्ताकवाद्यांचा कावा समजून येताच बुलांजे याने लष्करी नोकरीचा राजीनामा दिला आणि तो प्रतिनिधिसभेच्या पोटनिवडणुकीला उभा राहिला. तो जेथून उभा होता तो मुख्यत: खाणकामगार आणि शेतकरी याचा मतदारसंघ होता. त्यामुळे बुलांजे निवडून येणार नाही अशी प्रजासत्ताकवाद्यांची कल्पना होती. परंतु या श्रमजीवी जनतेनेच त्याला प्रचंड मताधिक्याने निवडून दिले.

बुलांजे याचे नशीब यावेळी जोरात होते.

प्रजासत्ताकवाद्यांची बदनामी व्हावी असे एक प्रकरण नेमके त्यावेळी उजेडात आले.

राष्ट्राध्यक्ष ज्यूल्स ग्रेव्हीचा जावई डॅनिएल विल्सन याने आपल्या सासऱ्याच्या अधिकारपदाचा फायदा घेऊन सरकारी सन्मानांचा आणि किताबांचा विक्रय आरंभिला होता. या प्रकरणामध्ये प्रजासत्ताकवादी पक्षाच्या अनेक कार्यकर्त्यांचे हात गुंतलेले होते. त्यामुळे लोक संतापले. आपल्या घरातच निर्माण झालेल्या या भ्रष्टाचारामुळे ज्यूल्स ग्रेव्ही याला राष्ट्राध्यक्षपदाचे त्यागपत्र तर द्यावे लागलेच, परंतु प्रजासत्ताकाचीही अप्रतिष्ठा झाली.

भ्रष्टाचाराचा हा वारसा तिसऱ्या फ्रेंच प्रजासत्ताकाने अखेरपर्यंत सांभाळला होता. राज्यकर्त्यांच्या शुचितेवरील आणि शासन-यंत्रणेच्या नि:पक्षपाती स्वरूपावरील लोकाचा एकदा का विश्वास उडाला की त्या देशाला किती वेळ दुर्दैवाचे दशावतार पहावे लागतात याचे या तिसऱ्या प्रजासत्ताकाच्या इतिहासामध्ये भरपूर पुरावे आहेत.

सत्ताबेभान राजकारण आणि भ्रष्ट आचरण यांचा शाप केवळ राज्यकर्त्यांनाच नव्हे तर साऱ्या देशाला भोगावा लागतो.

बुलांजेसारख्या महत्त्वाकांक्षी सेनानीला या वस्तुस्थितीचा फायदा घ्यायचा होता. लोकांनी निवडलेला प्रतिनिधी या नात्याने त्याने ८ जून १८८८ या दिवशी प्रतिनिधिसभेत प्रवेश केला. एखाद्या विजेत्याच्या रुबाबात, दाणदाण पावले आपटीत तो सभापतीच्या शेजारी जाऊन उभा राहिला आणि तेथून सभागृहाला उद्देशून म्हणाला, "गेली अनेक वर्षं फ्रान्सचं नैतिक आणि भौतिक जीवन सडून गेलं आहे. हे असंच चालू राहिलं तर सारा देश रसातळाला जाईल. वाझोट्या चर्चेच्या व्यासपीठाशिवाय या सभागृहाला काडीचही महत्त्व उरलेलं नाही म्हणून सध्याची राज्यघटना केराच्या टोपलीत टाकून एका समर्थ व्यक्तीच्या हाती फ्रान्सची सूत्रं सोपवायला हवीत. त्याशिवाय देशाचा तरणोपाय नाही."

बुलांजे याची ही भाषा ऐकताच, आतापर्यंत त्याचा पाठपुरावा करणारा क्लेमेन्सोही भडकला.

तो बुलांजेला म्हणाला, "ज्या ध्येयासाठी आम्ही झगडलो ते ध्येय साकार झालेलं

आहे याचं हे सभागृह प्रतीक आहे. म्हणून इथं होणाऱ्या चर्चेचा आम्हाला अभिमान वाटतो. या सभागृहाच्या म्हणून काही उणीवा असतील हे मला मान्य आहे. पण त्यामुळे या सभागृहाचा आवाज बंद पडणं त्याहूनही घातक ठरेल. होय, जिथं माणसाला आपले विचार मोकळेपणानं व्यक्त करता येतात ती भूमी आम्हाला गौरवास्पद वाटते. जिथ माणसाची मुस्कटदाबी होते त्या भूमीचा धिक्कार असो. तुझा केवळ विद्यमान राज्यघटनेलाच विरोध आहे असं नाही. तुला हे प्रजासत्ताकच खाली खेचायचं आहे."

क्लेमेन्सोच्या पाठोपाठ प्रधानमंत्री फ्लोके बोलायला उभा राहिला. तो म्हणाला, 'जनरल बुलांजे यानं या सभागृहापुढे जनरल नेपोलियन बोनापार्टच्या भाषेत का बोलावं हे मला माहीत नाही. परंतु, जनरल बुलांजे, तुला एक गोष्ट सांगितलीच पाहिजे. तुझ्याएवढं वय झालं तेव्हा नेपोलियन जिवंत राहिला नव्हता."

प्रतिनिधिसभा विसर्जित करण्याची आपली मागणी मान्य होणे शक्य नाही हे या भाषणावरून बुलांजे याला कळून चुकले. तरीही तो स्वस्थ बसला नाही. जहालमतवादी आणि समाजवादी यांचा डावा गट आणि राजनिष्ठांचा उजवा गट असे हे दोन परस्परविरोधी गट आपल्या पाठीशी उभे आहेत हे त्या चाणाक्ष सेनानीला ठाऊक होते. या दोन्ही गटांना आपल्या उद्दिष्टासाठी वापरायचे त्याने ठरविले.

बोर्बोन घराणे पुन्हा सिंहासनाधिष्ठित व्हावे यासाठी अनेक उमराव तळमळत होते. द्युके द्युझे नावाची धनाढ्य विधवा त्यांपैकीच एक होती. बुलांजेने तिला गाठले. बोर्बोन घराण्याकडे फ्रान्सचे सिंहासन यावे यासाठीच आपण धडपडत आहोत अशी बुलांजे याने तिच्यापाशी बतावणी करताच द्युके द्युझेच्या पैशाचा ओघ बुलांजेकडे वळला. इतरे काही धनवंतांनीही द्युके द्युझेचे अनुकरण केले. त्यामुळे बुलांजेची पैशाची काळजी दूर झाली. पुढल्या वर्षी फ्रान्समध्ये सार्वत्रिक निवडणुका होणार होत्या. त्यावेळी आपले पाठीराखे निवडून आणण्यासाठी बुलांजे याने प्रजासत्ताकविरोधी प्रचाराचा झपाटा आरंभिला. एक दैनिक वृत्तपत्र सुरू करण्याचाही त्याचा विचार होता. आपल्या हस्तकामार्फत बुलांजे निरनिराळ्या मतदारसंघामध्ये पैसा पेरू लागला.

निवडणुका होण्यापूर्वी, लष्कराच्या मदतीने आपण प्रजासत्ताकाविरुद्ध उठाव करावा असाही एक विचार त्याच्या मनात येऊन गेला. परंतु तसे करण्याने लोकमत बिथरेल म्हणून त्याने तो विचार मनातून दूर केला.

निवडणुकीची धामधूम सुरू झाली. यावेळी बुलांजे खुद्द पॅरिसमधून उभा राहिला. त्याला हे दाखवून द्यायचे होते की फ्रान्समधील अडाणी ग्रामीण भागच नव्हे तर जेथे क्रांती शिजली आणि पेटली ती राजधानीही आपल्या पाठीशी उभी आहे. आपण निवडून आल्यानंतर काय करायचे हे बुलांजेने आपल्या मनाशी पक्के केले होते— सरळ एलिसे प्रासादात जाऊन राष्ट्राध्यक्षांना बाहेर काढायचे आणि त्यांच्या खुर्चीवर आपण बसायचे.

बुलांजेच्या डोळ्यासमोर कोणते स्वप्न तरळत आहे याची प्रजासत्ताकवाद्यांना जाणीव झाली तेव्हा कोठे त्यानी गटबाजीचे राजकारण बाजूला सारून बुलांजे याच्याविरुद्ध सर्व गटांच्या वतीने एकच उमेदवार उभा करण्याचे ठरविले. निवडणुकीच्या प्रचारी रणधुमाळीला प्रारंभ झाला. साऱ्या देशाचे लक्ष या निवडणुकीवर खिळले होते.

प्रजासत्ताक विरुद्ध हुकूमशाही असा हा सामना होता.

प्रजासत्ताकवाद्यांनी प्रयत्नाची पराकाष्ठा केली आणि तरीही अठ्याहत्तर हजार अधिक मते मिळवून बुलांजे याने प्रजासत्ताकवाद्याना चित केले.

बुलाजे निवडून आला आहे हे कळताच सारे पॅरिस आनंदाने वेडे झाले निवडणुकीचा निकाल ऐकण्यासाठी बुलाजे आपल्या मित्राना बरोबर घेऊन एका उपाहारगृहामध्ये बसला होता. निकाल जाहीर झाला तेव्हा रात्रीचे नऊ वाजले होते. हजारो लोक त्या उपाहारगृहाभोवती जमून गर्जत होते—' आताच्या आता एलिसे प्रासाद ताब्यात घ्या.'

बुलांजेने आपल्या सहकाऱ्यांना विचारले, ' मी आता काय केलं पाहिजे असं तुम्हाला वाटतं ?'

' हा क्षण तुमचा आहे. सर्वस्वी तुमचा आहे. तो वाया घालवू नका.'

सहकाऱ्याचे म्हणणे खरे होते. नियती बुलांजेला खुणावत होती.

बुलाजे निवडून आल्याचे कळताच सारे मंत्रिमंडळ हबकून गेले. जो तो पळायची तयारी करू लागला. राष्ट्राध्यक्षांनी मंत्रिमंडळाची तातडीची बैठक बोलावली. पण फारच थोडे मंत्री तिला हजर राहिले. काही क्षणामध्ये हे प्रजासत्ताक इतिहासात विरून जाणार आहे याबद्दल कोणालाच शंका उरली नाही.

एका इतिहासकाराने लिहिले आहे—' त्या क्षणी एकटा बुलांजे पॅरिसचा स्वामी


पुरंदऱ्यांची दौलत

नऊ पेशवेकालीन कथा

ब मो. पुरंदरे

किंमत : साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

होता. पोलिस त्याच्या बाजूचे होते, सैनिक त्याच्या बाजूचे होते, लोक त्याच्या बाजूचे होते. त्याने एलिसे प्रासादात प्रवेश करण्याचाच काय तो अवकाश होता.'

पण दैवगती वेगळी होती.

जो क्षण यावा म्हणून बुलांजे दोन वर्षे अव्याहृत धडपडत होता तो क्षण त्याच्या जवळ आला तेव्हा या सेनानीला निराळ्याच उन्मादाने भारून टाकले. मन्मथाने त्याचे मन भलत्या वेळी चाळविले. मित्राचा सल्ला आणि लोकांच्या घोषणा त्याला आता ऐकू येत नव्हत्या. केव्हा एकदा आपण आपल्या प्रेयसीच्या बाहुपाशात शिरतो असे त्याला झाले होते. एलिसे प्रासादातील सिंहासनाऐवजी त्यावेळी त्याच्या डोळ्यांपुढे मार्गारेट द बोनेमिनची सुखशय्या नाचत होती.

एलिसे प्रासादाचा रस्ता सोडून बुलांजे मार्गारेटच्या महालाकडे वळला. दोन एक तास त्याने मार्गारेटच्या सहवासात स्वत:ला झोकून दिले होते. गात्रे शिथिल झाली तेव्हा तो भानावर आला आणि तडक आपल्या मित्रांकडे येऊन म्हणाला, 'असं स्वस्थ काय बसलात! चला, आपल्याला एलिसे प्रासाद ताब्यात घ्यायचा आहे ना!'

मित्रांनी हताश स्वरात सांगितले, 'जनरल, ती वेळ मघाशीच निघून गेली आहे. आता सारं काही संपलेलं आहे. तुम्ही पुन्हा मार्गारेटकडे जावं हेच बरं.'

एका भीषण नाट्याचे विदुषकी प्रयोगात रूपांतर झाले होते.

प्रजासत्ताकवादी पक्षाने सुटकेचा निश्वास टाकला. कारण ज्या झपाट्याने बुलांजेच्या लोकप्रियतेला भरती आली होती त्याच वेगाने ओहोटी लागली. त्याच्यासंबंधी बोलताना लोक कुचेष्टेचे शब्द वापरू लागले. सरकार उलथून टाकण्याचा प्रयत्न केल्याच्या आरोपावरून त्याच्यावर खटला भरावा असा सरकारचा प्रारंभी विचार होता. पण बुलांजे आता इतका बदनाम झाला होता की त्याच्यावर खटला भरण्याने सरकारचीच अप्रतिष्ठा झाली असती. बुलांजे याला ब्रुसेल्स येथल्या लष्करी कचेरीत धाडून देण्यात आले.

मार्गारेट द बोनेमिनला पुढे क्षय झाला आणि म्हणून बुलांजेला भेटण्यासाठी ती ब्रुसेल्सला गेली. तेथेच तिचा अंत झाला. तिच्या विरहाने बुलांजे इतका वेडापिसा झाला की एक दिवस तो दफनभूमीवर गेला आणि मार्गारेटच्या स्मृतिशिळेवर बसून त्याने स्वत:वर पिस्तुल उडवून घेतले. त्याच्या खिशात एक चिठ्ठी सापडली. त्या चिठ्ठीत त्याने लिहिले होते, 'ज्या जगात मार्गारेट नाही तेथे राहणे मला अशक्य झाले आहे.'

प्रजासत्ताकावर आलेले प्राणसंकट बुलांजेबरोबरच विरून गेले; परंतु त्यानंतर पाच वर्षांनी आणखी एक संकट उभे टाकले.

त्याचे स्वरूप मात्र अगदी वेगळे होते.

(क्रमशः)




सुधाकर राजे

## ▫ सत्यप्रियतेचा डोस

एका जर्मन शास्त्रज्ञाने नुकतेच असे मत मांडले आहे की दुकानात उचलेगिरी करणाऱ्या भुरट्या चोरांची भुरटेगिरी ही एक मानसिक व्याधी असून ती गोळ्या देऊन बरी करणे शक्य आहे. म्हणजे मागे स्मरणशक्तीच्या गोळ्या निघाल्या होत्या तशा आता प्रामाणिकतेच्या गोळ्या निघाल्या म्हणायच्या. अन् भुरट्या चोऱ्या हा एक लहानसा मानसिक रोग गोळ्यांनी बरा होऊ शकतो तर दरवडयाचा मोठा रोग निदान इंजेक्शनने तरी बरा व्हायला हरकत नसावी. निदान डोकेदुखीवर ज्याप्रमाणे अॅस्प्रो, अॅनासीन, कोडोपायरीन, सारीडॉन इत्यादि निरनिराळ्या प्रकारच्या गोळ्या आहेत तशा निरनिराळ्या प्रकारच्या चोरटे-पणावर निरनिराळ्या गोळ्या हव्यात हे ओघानेच आले. उदाहरणार्थ, फळ-वाल्याच्या दुकानातला पेरू पळवणाऱ्या पोराला जी गोळी देऊन काम भागेल तिचा जवाहिऱ्याच्या तिजोरीतून मोत्यांचा हार लंपास करणाऱ्या भामट्यावर काहीच परिणाम होणार नाही हे उघड आहे.

मशारनिल्हे शास्त्रज्ञ म्हणतात, एखादी वस्तू चोरण्याचा मनाला जो मोह पडतो तो मोह या गोळ्यांनी आटोक्यात आणता येईल. च्यामारी, म्हणजे पृथ्वीवर सज्जनांचा स्वर्ग निर्माण करायचे केमिकल सापडले म्हणायचे. साधारणपणे प्रत्येक माणूस हा मोहात्मा असतो, तो आता गोळी तोंडात टाकून महात्मा होणार! पण मी म्हणतो, चोरी करण्याचा मोह बरा करणाऱ्या गोळ्या मिळतात तर इतर अनेक प्रकारचे मोह बरे करण्याची औषधेही कोपऱ्यावरच्या केमिस्टकडे मिळायला काय हरकत आहे? भाषणबाजीचा मोह नाहीसा करण्याचा डोस प्रत्येक पुढाऱ्याला सक्तीने दिला अन् साड्या घेत सुटण्याचा मोह बरा करण्याची पावडर गोडी-गुलाबीने प्रत्येक गृहिणीला दिली तर जगातल्या तमाम पुरुषांचे सामाजिक व कौटुंबिक जीवन भलतेच सुखी होईल हे मी स्वानुभवाच्या जोरावर सांगू शकतो.

ते काही असो, यापुढे 'खोटे कधी बोलू नये, चोरी कधी करू नये' अशी खास शिकवण देण्याची आवश्यकता नाही. चोराला शिक्षा देणारा न्यायाधीश यापुढे

सहा महिने सक्तमजुरी असे लिहिण्याच्याऐवजी मिक्श्चर लिहून देईल, अन् चेकवर खोटी सही करणाऱ्या खोटारड्याला, लहान मुलाला जबरदस्तीने एरंडेल पाजतात त्याप्रमाणे लिक्विड प्रामाणिकतेचा डोस पाजण्यात येईल.

## ▫ तळपायाची समस्या मस्तकाला

लांब केस वाढविणारा पुरुष ऑफिसचे काम अधिक चांगले करू शकतो की कमी चांगले या पश्चिमेत गाजलेल्या वादाचे समाधानकारक उत्तर अजून सापड॰लेले दिसत नाही. अमेरिकेत कॅलिफोर्नियाच्या प्रांतीय सरकारने लांब केस वाढ॰विणाऱ्या बेकार पुरुषांना बेकारी भत्ता देण्याचे नाकारले आहे, तर काही तज्ज्ञांच्या मते लांब केस ठेवणारे पुरुष अधिक प्रामाणिक असतात, व त्यामुळे अधिक मन लावून काम करतात. प्रश्न मोठा कठीण आहे यांत शंका नाही. कपड्यावरून लायकी ठरविणाऱ्या आजच्या युगात केसावरून लायकी ठरविण्याची पाळी येणे म्हणजे टोकदार बूट घातलेल्या तळपायाची समस्या अक्षरशः मस्तकाला पोचली असे म्हणावे लागेल. मला वाटते लांब केस वाढविणाऱ्या पुरुषांची कार्यक्षमता ठरविण्याच्या आधी बॉबकट करणाऱ्या बायकांची अकार्यक्षमता वाढते की कमी होते हे पहावे. उदाहरणार्थ लांबसडक दोन वेण्या घालणारी मालू पाटकर स्टेटमेंट तयार करताना जितक्या चोडचुका करते त्याच्यापेक्षा बॉबकट ठेवणारी मॉली पिंटो कमी करते की जास्त करते? अन् त्याहीपेक्षा महत्त्वाचे म्हणजे मालू पाट॰करने स्वतःच बॉबकट केल्यावर तिच्या चुका किती वाढल्या किंवा कमी झाल्या?

मला वाटते या प्रश्नाचे उत्तर एकेकाळी गाजलेल्या सकच्छ की विकच्छ, कुंकवाची टिकली की टिळा, या प्रश्नांच्या उत्तराइतकेच अवघड आहे. तेव्हा लांब केसाने टायपिंग चांगले होते की आखूड, असल्या गहन प्रश्नात पडण्यापेक्षा मिनि॰स्कर्ट घालणारी कारकुनिका अधिक कर्तबगार की बेलबॉटम घालणारी, असा एखादा सोपा प्रश्नच सोडवायला घ्यावा. शिवाय निदान हिंदुस्थानात तरी केसावर अवलंबून असणाऱ्या कार्यक्षमतेचा प्रश्न प्रत्यक्ष सरकारनेच केसाच्या टोपांचा कारखाना काढून सोडवला आहे. कुणाचेही प्रमोशन अडले की त्याने सरळ 'ज्युलिएट विग' कंपनीकडे धाव घ्यावी, म्हणजे काम फत्ते. अमेरिकेत 'सुताराचा अध्यक्ष कसा झाला' अशा प्रकारच्या उत्कर्ष-कथा बऱ्याच वाचायला मिळतात. हिंदुस्थानात 'कारकुनाचा कलेक्टर कसा झाला' याचे उत्तर सोपे आहे–'जुलिएट विग' घालून.

▫ ▫ ▫

शरद गोखले

# औद्योगिक ललितकला मंडळ नाट्यस्पर्धा

पुणे शहराच्या परिसरात कारखान्यांची झपाट्याने वाढ होत आहे. कारखान्यांच्या वाढीबरोबरच कामगारांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. या कामगार क्षेत्रामध्ये औद्योगिक ललितकला मंडळ ही संस्था महत्त्वपूर्ण कामगिरी बजावत आहे. ललितकला मंडळाच्या अनेकविध कार्यांपैकी प्रतिवर्षी होणाऱ्या नाट्यस्पर्धा अनेक दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण असतात. चालू वर्षीच्या स्पर्धेमध्ये सादर करण्यात आलेल्या वीस बावीस एकांकिकांमधून टेल्कोच्या प्रेस टूल डिव्हीजनमार्फत सादर करण्यात आलेल्या विजय तेंडुलकर यांनी लिहिलेल्या ब्रह्मांडाची पोकळी आणि अवकाशाच्या आकाशातील पोल या एकांकिकेस प्रथम पारितोषिक मिळाले. मॉडर्न पेंटिंग्जचे जे फाजील स्तोम माजवण्यात येते त्याचे उत्कृष्ट विडंबन या एकांकिकेमध्ये केले आहे.


श्री. शशिकांत दिघे यांनी प्रयोगाचे दिग्दर्शनावर भरपूर मेहनत घेतल्याचे जाणवत होते. आर्ट गॅलरीचे वातावरण त्यांनी चांगल्या प्रकारे निर्माण केले होते. संघ म्हणून समर्थपणे उभे राहण्यात टेल्कोचे कलाकार यशस्वी झाल्याने एक एकसंध नीटस प्रयोग पाहिल्याचे समाधान या एकांकिकेने दिले. प्रत्येक कलावंताला आपल्याला काय करायचे आहे याची स्पष्ट कल्पना असल्याचे निश्चितपणे जाणवत होते. आणि या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नातून एकांकिका यशस्वी होण्यासाठी आवश्यक असलेला Impact निर्माण झाल्याने एकांकिका प्रथम क्रमांकाचे यश घेऊन गेली.

गेल्या वर्षी याच नाट्यसंघाने प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले होते. यंदाही आपली गुणवत्ता सिद्ध करून त्यांनी हा सन्मान पटकावला. कलावंतांपैकी विहंग नायक (पंढरपूरहून आलेला इसम), सौ. निला पंडीत व विवेकानंद जोशी या कलावंतांचा नामनिर्देश न केल्यास त्यांच्यावर अन्याय केल्यासारखे होईल.

चालू वर्षीच्या स्पर्धेपैकी सर्व एकांकिका पहाणे शक्य झाले नाही. तथापि "एक इच्छा राहिली होती" व "मी अनिकेत सहस्रबुद्धे" या पारितोषिक विजेत्या दोन एकांकिकांखेरीज डॉ. बेक आणि कंपनीने सादर केलेल्या मावशीचा प्रयोग अनेक दृष्टीने सरस ठरला. दिग्दर्शनाचे उत्कृष्ट पारितोषिक या एकांकिकेचे दिग्दर्शक श्री. राजू मेहेंदळे यांना मिळाले. या खेरीज ज्योतीबाबूंची भूमिका करणारे श्री. शरद वतक यांनी अभिनयाचे प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळवले. नाट्य-लेखनाचे पारितोषिक श्री. सु. वि. पारखी यांना "मी अनिकेत सहस्रबुद्धे" या एकांकिकेच्या लेखनाबद्दल मिळाले.

## हिंदी एकांकिका

कामगार क्षेत्रामध्ये अमहाराष्ट्रीय मंडळी मोठ्या प्रमाणावर असल्याने संस्थेने यंदा प्रथमच हिंदी एकांकिकांच्या स्पर्धा आयोजित केल्या. स्पर्धेमध्ये केवळ ५



फिलिप्स इंडियाने सादर केलेल्या
'एक इच्छा राहिली होती' मध्ये
बबन निंबाळकर । जगदीश खरे । प्रतिभा फडणीस

नाट्यसंघांनी भाग घेतला. 'पर्दा उठनेसे पहले' या प्रथम पारितोषिक विजेत्या एकांकिकेचा प्रयोग मी पाहिला. प्रयोगाचा दर्जा अतिसामान्य होता. उरलेल्या चार एकांकिकांची पातळी काय असावी याची सहज कल्पना यावरून येण्यासारखी आहे. तांत्रिक दोष, व अभिनयाचा दर्जा, या गोष्टी बाजूला ठेवल्या तरी हिंदी एकांकिकांमध्ये निदान पाठांतर, व चागली हिंदी बोली या किमान अपेक्षा आहेत. या दोन्ही बाबतीत 'पर्दा उठनेसे पहले' या एकांकिकेने साफ निराशा केली. असे असले तरी संस्थेने हिंदी–एकांकिका स्पर्धांचा हा उपक्रम नेटाने चालू ठेवणे आवश्यक आहे.

या स्पर्धांचे संयोजन संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या कौशल्याने केले. दोन एकांकिकांमध्ये केवळ १० मिनिटांचा वेळ दिल्याने नेपथ्यावर मर्यादा पडल्या. व सांघिक प्रयत्नांवर भर द्यावा लागला. श्रीं. केशव घुले हे औद्योगिक ललित कला मंडळाच्या पदाधिकाऱ्यांपैकी एक आहेत. त्यांनी या स्पर्धेत स्पर्धक म्हणून उतरणे हास्यास्पद आहे. पुढील वर्षी त्यांनी या स्पर्धेमध्ये उतरू नये हे उत्तम. सुमारे आठवडाभर चाललेल्या या स्पर्धेमध्ये सुमारे तीन साडेतीनशे कलाकारानी–तंत्रज्ञांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला. कामगार वर्गामध्ये या एकांकिका स्पर्धांनी चांगलीच लोकप्रियता सपादन केली आहे. सध्या काही प्रमाणात उणीव आहे ती प्रेक्षकांची. स्पर्धेतील एकांकिकांचा दर्जा ज्या प्रमाणात सुधारत जाईल त्या प्रमाणात लोकाश्रयही लाभेल असा विश्वास आहे.

□ □ □

## ऑपेरा !

एका गृहस्थाने आपल्या लहान मुलाला पहिल्या प्रथमच 'ऑपेरा' पहावयास नेले.

कंडक्टरने हातातील छडी फिरवण्यास सुरुवात केली आणि त्याबरोबर गायिकेने ऑपेरातील 'एरिया' गाण्यास प्रारंभ केला.

थोडा वेळ लक्षपूर्वक पाहिल्यानतर मुलाने वडिलांना विचारले,

'हा गृहस्थ त्या बाईला एकसारखा छडीने का मारतो ?'

वडिलानी सांगितले, 'तो तिला मारत नाही !'

मुलाने परत विचारले,

'मग ती बाई रडते, ओरडते का ?'

–इंद्रधनु

करता, असं काही घडेल का हा प्रश्न उभा राहतो. समाजवादाचे नि जनकल्याणाचे ढोल बडवले जात असता, जमीन सुधारणा कायद्याची अमलबजावणी करण वगैरे सारख उपाय योजायला बहुतेक सगळीच राज्य कां कू करताना दिसतात. अर्थात, नक्षलवादी चळवळीमागील खरी कारणं सापडली तरी, ती दूर करण्यासाठी प्रत्यक्ष कृतीऐवजी दूर करण्याच्या निव्वळ घोषणाच होतील हे सागायला नको! वास्तविक स्वतःला लोकशाहीवादी, समाजवादी वगैरे वगैरे म्हणवून घेणाऱ्या सर्वच डाव्या-उजव्या पक्षांना हे आव्हान आहे. परंतु, दुर्दैवाने सगळेच राजकीय पक्ष, आज आपसातली दुही खुर्च्या टिकवण्यासाठी स्वार्थी-लुच्ची लठ्ठालठ्ठी ह्यातच चूर आहेत नक्षलवाद्यांच्या सामाजिक, राजकीय, वैचारिक आव्हानाशी टक्कर द्यायची धमक आज खरं म्हणजे कुठल्याच राजकीय पक्षापाशी नाही! आणि म्हणूनच, नक्षलवादी चळवळ ही एक आज चिंतनीय समस्या बनली आहे. ती सोडवता येईल, नाही असं नाही. मात्र त्यासाठी सर्वच राजकीय पक्षांनी आधी अंतर्मुख होऊन विचार केला पाहिजे!

# भडकते महागाई निर्देशांक

मुंबईतले एक आघाडीचे कामगार नेते श्री. आर. जी. मेहता ह्यांनी, सरकारी यंत्रणेनंच प्रसिद्ध केलेल्या माहितीच्या आधारे, गेल्या काही वर्षांतल्या, विशेषतः गेल्या काही महिन्यातल्या जीवनमान निर्देशांकांची आकडेवारी प्रसिद्ध केली आहे. त्या आकडेवारीनंतर, लालनिशाण गटाच्या नेत्यानीही काही अशीच माहिती प्रसिद्ध केली आहे. ह्या आंकडेवारीच्या तपशीलात न शिरता, ह्या अहवालाकडे नुसती दृष्टी टाकली तरी काही गोष्टी स्पष्ट होतात. गेल्या अवघ्या वर्षभरात निर्देशांक, जवळजवळ शभर अंशानी वाढला आहे. ह्याचाच अर्थ सर्व जीवनावश्यक वस्तूंच्या किंमतीत सुमारे दीड ते दुपटीने वाढ झाली आहे त्यातही बरीचशी वाढ गेल्या चार-पाच महिन्यातलीच आहे. वाढत्या जीवनमान निर्देशांकाचा अर्थ स्पष्ट आहे. भाव भडकत आहेत. दैनंदिन जीवन अधिकाधिक कष्टप्रद होत आहे हाच ह्याचा अर्थ. काही थोड्या कामगाराना निर्देशांकानुसार महागाई-भत्ता मिळतो. परन्तु इतर बहुसंख्य कामगार, मध्यमवर्गीय शासकीय कर्मचारी ह्यांना ठराविकच महागाई मिळते. निर्देशांकानुसार महागाई मिळणाऱ्या कर्मचाऱ्यानादेखील, वाढीव महागाई व प्रत्यक्ष भाववाढ ह्याचं प्रमाण मोठ्या प्रमाणात व्यस्त वाटतं. अर्थात निर्देशांकानुसार महागाई मिळत नसलेल्यांची परिस्थिती ह्याहीपेक्षा बिकट असणार हे उघड आहे. शिवाय, निर्देशांक ठरविण्यासाठी निवडण्यात आलेल्या वस्तूंपेक्षा,

जीवनावश्यक वस्तूंची व्याप्ती आज वाढलेली आहे. अशा परिस्थितीत सर्वसामान्य जनतेचं आजचं जिणं अधिकाधिक कठीण नि म्हणूनच स्फोटक बनत चालले आहे.

निर्देशांकात गेल्या वर्षभरात झालेली वाढ, १९४८ नंतरची विक्रमी वाढ आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणात ही वाढ गेल्या वर्षी प्रथमच झाली आहे. आणि त्यातही गेल्या पाच महिन्यातली वाढ अधिक गंभीर आहे. त्यातही गमत ही की गेल्या वर्षातच समाजवाद, दलितोद्धार वगैरेच्या मोठाल्या घोषणांना ऊत आला होता. किंबहुना त्याच कारणामुळे कांग्रेस दुभगली. त्याचसाठी कम्युनिस्ट-प्रसोपा आदींनी इंदिरा-कांग्रसला पाठिंबा दर्शविला. परंतु ह्या साऱ्या घोषणाच ठरल्या बँक राष्ट्रीयीकरण, तनखे-बंदी वगैरेंसारखी उपाययोजना म्हणजे वास्तवात, निव्वळ धूळफेक होती. ह्या गोष्टीमुळे सामान्य जनतेच्या दैनंदिन जीवनावर कुठलाही परिणाम होणार नव्हता. त्याच्या नशिबीचं दैन्य टळणार नव्हतं. परंतु त्यामळे समाजवादी घोषणांसाठी, समाजवादी ढोंगासाठी पोषक वातावरण मात्र निर्माण होणार होत. सत्तारूढ कांग्रेसनं नेमक हेच केल. एकीकडे समाजवाद, राष्ट्रियीकरण, तनखे बंदी आदि घोषणानी बहुजन समाजाला मोहजालात गुरफटवून ठेवल; तर त्याचवेळी भाववाढ, दलिताची पिळवणूक इत्यादीना मोकळं रान सरकारन उपलब्ध करून दिलं. परंतु ह्या घोषणाबाजीच स्वरूप कळून यायला लोकांना वेळ लागणार नाही. सध्याच्या समाजवादी घोषणांचं, धोरणाचं वेगडी स्वरूप उघड होऊ लागताच, लोकांमध्ये खदखदत असलेल्या असतोषाचं प्रक्षोभक वणव्यात रूपांतर व्हायला वेळ लागणार नाही. म्हणूनच, तनखे वगैरेसारख्या सामान्य जनतेशी दुरान्वयाने देखील संबध नसलेल्या प्रश्नांवर प्रतिष्ठा पणाला लावणाऱ्यानो, समाजाच्या खऱ्याखुऱ्या निकडीच्या प्रश्नाकडे प्रथम लक्ष पुरविलं पाहिजे. नाहीतर वेगडी समाजवादाच्या मोहजालात देशाला गुतवून, खऱ्या समाजवादापासून मात्र समाजाला दूर ठेवायचच श्रेय त्यांना मिळेल ! ◻ ◻ ◻

## कथास्पर्धा

नवोदित लेखकाच्या साहित्यगुणाना वाव देण्यासाठी 'झेप'च्या पहिल्या अकाच्या निमित्ताने नवोदित लेखकांसाठी 'कथास्पर्धा' अयोजित करण्यात आली आहे. पहिल्या तीन कथांना अनुक्रमे ३० रु २० रु व १५ रु. पारितोषिक देण्यात येईल व त्याना 'झेप'च्या पहिल्या अकात स्थान देण्यात येईल.

कथा २० जूनच्या आत खालील पत्त्यावर पाठवाव्यात.

**'झेप' (कार्यालय)**
सीता सदन, बाळ गोविददास रोड,
माहिम, मुबई-१६

 [ पृष्ठ १२ वरून ]

त्याच्या कानी पडू लागतो. रेल्वेगाडी जवळ-जवळ येऊ लागते. या रेल्वेगाडीबरोबर सगिना वाढला. एका ठिकाणी ती उडविण्याचा विचार पुढारी करतात तेव्हा सगिना म्हणतो, छे छे. हीं तर आमची आई आहे, आई ! हिने आम्हाला पोसले, वाढवले. आम्ही हिच्यामुळे आहोत. ही नाही नष्ट करायची !

रेल्वेगाडी झुकत झुकत वळणे घेत जवळ येऊ लागते, तशी सगिना आतून उजळू लागतो, त्याचा चेहरा फुलू लागतो. डोक्यातले किडे जणू जादूने अंतर्धान पावतात. आणि रेल्वेगाडी जाऊ लागताच अफसरकीचे खोटे अवसान टाकून, रेल्वेच्या अगासांयावर वाढलेला खेळलेला सगिना महातो रेल्वेगाडीबरोबर बाजूनेच धावू लागतो. उड्या मारीत, आरोळ्या मारीत धावतो. धावतो तसा आणखी उजळतो, आणखी फुलतो. आणखी लहान होतो. आणखी धावतो. तो रेल्वेगाडी जणू त्याची सवंगडी होते.

सगिना महातोच्या व्यक्तिमत्त्वाविषयी हा एक प्रसंग एखाद्या कादंबरीच्या अनेक प्रकरणात सामावणार नाही असे काहीतरी काही क्षणात फार प्रभावीपणे आपल्याला सांगून टाकतो आणि अशा सगिना महातोची होऊ घातलेली राजकीय आणि प्रत्यक्ष शिकार आपल्याला आत-आत वाढते बेचैन करते. कोणत्याही प्रकारे सहानुभूतीची याचना न करणारा ताठ कण्याचा सगिना एका हक्काने आपले प्रेम, आपली सहानुभूती मिळवीत जातो.

दिलीपकुमारची ही दीर्घ काळानंतर ठरीव छापाबाहेरची एक रसरशीत भूमिका. लोकप्रिय नायकाला या प्रकारची खरोखरी वेगळी, समर्थ भूमिका मिळते तेव्हा


# मुजऱ्याचे मानकरी

ब. मो. पुरंदरे

तीन रुपये

राजहंस प्रकाशन

त्याच्यापुढे दुहेरी आव्हान असते. एक तर त्याला स्वतःचे फिल्मी व्यक्तिमत्त्व — प्रत्यक्षातले आणि जनमनातले — काही एकदम फेकून देता येत नाही या खाकून खुटीला टांगताही येत नाही. ते बरोबर वागवीत तरीही आवश्यक तिथे त्याचा विसर पाडून घेत आणि पाडीत त्याला भूमिकेला भिडावे लागते. हे साधून मग त्या भूमिकेचे सारे सामर्थ्य बाहेर काढण्याचे अवघड, नाजूक काम त्याला करावे लागते. दिलीपकुमार ही दुहेरी जबाबदारी पार पाडण्यात या चित्रपटात खूप यशस्वी ठरला आहे. मुळात पूर्वी अचूक परंतु किमान अभिनय आणि पुटपुटते संवादोच्चारण यांवर मिस्त ठेवणाऱ्या दिलीपकुमारमध्ये अलीकडे एक मोठा बदल घडला आहे. तो फार वरच्या पट्टीत अभिनय करू लागला आहे. शब्द, शरीर यातून तो एक उसळते, अदम्य चैतन्य एखाद्या प्रचंड जलप्रपातासारखे, धुवांधार वर्षाधारेसारखे, नाहीतर गरजत्या वादळासारखे व्यक्त करू लागला आहे. माणसातले रसरशीत आणि नैसर्गिक बालसुलभशी पशुत्व तो मुक्तपणे, विलोभनीयतेने साकार करू लागला आहे. एका अगदी निराळ्या प्रकारे अँथनी क्विन या पाश्चात्य नटाची आठवण तो देतो. या चित्रपटात दिलीपकुमारच्या या नव्या अभिनयाचे परिपूर्ण रूप सापडते. दिलीपकुमारचा सगिना महातो बनता बनता चित्रपटाच्या चौकटीपेक्षा मोठा आणि खरा बनतो. चौकट विझूनही तो उजळ, तेजःपुंज, रसरशीत, ताठ शिल्लक रहातो. अँथनी क्विनच्या झोर्बाइतका महातो मुळातच मोठा नाही; परंतु दोघांची जातकुळी तीच आहे; आणि म्हणून दोघेही विलोभनीय वाटतात. चित्रपटगृहाबाहेरही आपल्याबरोबर दीर्घकाळ रहातात.

बाकी या चित्रपटात जो आहे ती दिग्दर्शकाची विषयाची विलक्षण समज आणि मर्यादित खर्चात चित्रपट पुरा करण्याच्या शर्तीपायी त्याच्या कारागिरीवर जागोजाग पडणाऱ्या मर्यादा. या चित्रपटाला परिणाम आहे परंतु तांत्रिक सफाई नाही.

बंगालच्या आजच्या लाल हवेत लाल यंत्रणेवर नेमका आघात करणाऱ्या या बंगाली चित्रपटाचे भवितव्य काय? कोणास ठाऊक तो बंगाली असूनही कोणालाही कळतो आणि विशेषतः जे प्रचलित राजकीय यंत्रणांशी आणि संघटनांशी परिचित आहेत त्यांना तर फारच कळतो आणि पटतो. तो केवळच कम्युनिस्ट-विरोधी नाही. तसे मानणे हा त्यावर अन्याय ठरेल. तो तमाम संघटित आणि स्वार्थी, संकुचित बिनकाळजाच्या राजकीय यंत्रणाविरुद्ध आहे. त्याच्या अधम कर्तृत्वविषयी आहे. माणसामधल्या सत्वाचा, चैतन्याचा गळा घोटून त्या कशा पुष्ट होतात त्याची विदारक कथा तो सांगतो.

शेवटी एक अपरिहार्य स्मरण : आपल्या मराठी चित्रपटात असा एखादा खऱ्याखुऱ्या अर्थाने 'आज'चा, महत्त्वाचा आणि वेगळा विषय कधीतरी येईल का?...

□ □ □

हंसाबाईंच्याजवळ विद्वत्ता नाही.
आपल्या जीवनकथेला गोंडस रूप देण्यासाठी
आवश्यक असलेली वाङ्मयकला[नाही.
त्यांच्याजवळ आहे ते
जे जाणतेपणे, अजाणतेपणे
डोळे उघडे ठेवून व आंधळेपणाने
अनुभवले, उपभोगले, सोसले ते ते.
त्याची ही कहाणी आहे.

—वा. ल. कुलकर्णी

हंसा वाडकर

# सांगत्ये ऐका

किंमत : आठ रुपये

राजहंस प्रकाशन

## सिलोनमधील डाव्यांचा विजय

[ पृष्ठ १८ वरून ]

होता; पण शिक्षण मोफत झाल्याने कॅथालिकांच्या नव्या पिढीत हा रोष फारसा दिसत नाही. तरुण कॅथालिकांची मते सिरिमाओच्या पक्षाने मिळविली. मुस्लिमांमध्येही यावेळी इस्लामिक समाजवादी आघाडी स्थापन झाली होती व तिने आघाडीस पाठिंबा दिला होता. तामिळ जमातीने मात्र फेडरल पार्टी व तामिळ काँग्रेस या आपल्याच दोन पक्षांना पाठिंबा दिला. फेडरल पार्टीने गेल्या निवडणुकीत १४ व यावेळी १३ जागा मिळविल्या. तामिळ काँग्रेसने गेल्या वेळेइतक्याच तीन जागा याही वेळी मिळविल्या. या पक्षाने सेनानायके यांच्या पक्षास पाठिंबा जाहीर केला होता.

सिलोनमधील भारतीय कामगार-वर्गामध्ये याच निवडणूक धोरणाबाबत एकमत नव्हते. सिलोन वर्कर्स काँग्रेस या सर्वात मोठ्या संघटनेने डडले सेनानायके यांच्या युनायटेड नॅशनल पार्टीस पाठिंबा दिला होता, तर डेमोक्रॅटिक वर्कर्स काँग्रेसने डाव्या आघाडीस पाठिंबा जाहीर केला होता. नॅशनल युनियन ऑफ वर्कर्स या संघटनेने कोणालाच पाठिंबा न देता स्वतःचे दोन उमेदवार उभे केले होते, तर सिलोन प्लँटेशन वर्कर्स युनियन या पेकिंगवादी कम्युनिस्ट पक्षाच्या कामगार संघटनेने पक्षाच्या आदेशानुसार निवडणुकांवर बहिष्कार टाकला होता. या सर्व कामगार संघटनानी एक भूमिका घेतली असती तर पंचवीस मतदारसंघांच्या निकालावर तरी त्याचा परिणाम झाला असता. कारण या प्रत्येक मतदारसंघात त्याचे दोन हजारावर मतदार होते.

आपण लोकशाही समाजवादाचे पुरस्कर्ते असल्याचा प्रचार युनायटेड नॅशनल पार्टीचे नेत्यानी केला, पण मतदारानी प्रस्थापित भांडवलदारी समाजरचना टिकवू पहाणारा पक्ष याच दृष्टीने या पक्षाकडे पाहिले. बडे भांडवलदार, वरिष्ठ मध्यमवर्ग, सधन शेतकरी हे या पक्षाचे मुख्य पाठीराखे होते. 'लेक हाऊस' या बड्या भांडवलदारी वृत्तपत्रांच्या गटाने याच पक्षाला जोरदार पाठिंबा देऊन डाव्या आघाडीविरुद्ध प्रचार केला होता. मोठ्या वृत्तपत्रांचे राष्ट्रीयीकरण करण्याचा पूर्वीच्या डाव्या आघाडीच्या सरकारचा विचार आहे असे दिसताच आघाडीत फूट पाडून सरकार खाली ओढण्यात या वृत्तपत्र गटाचा मोठा वाटा होता. डाव्या गटाचा म्हणूनच या वृत्तपत्रांवर रोष होता. निवडणूक निकालानंतर अतिरेकी डाव्या निदर्शकांनी या वृत्तपत्रांच्या कचेरीवर हल्ला करून मोडतोड केली. नव्या सिलोन सरकारने १३० लोकांचे पासपोर्ट रद्द केले आहेत त्यात या वृत्तपत्र गटाचे चेअरमन, वरिष्ठ अधिकारी व काही संपादक आहेत.

सिलोनमध्ये अठर वर्षावरील प्रौढांना मतदानाचा हक्क आहे. अठरा ते एकवीस वयाच्या नव्या पिढीस सुशिक्षितांच्या बेकारीचा प्रश्न भेडसावीत असून निवडणुकीत

तिचा पाठिंबा डाव्या आघाडीस मिळाला. प्राथमिक शाळेपासून पदव्युत्तर टप्प्यापर्यंतचे शिक्षण मोफत असल्याने बेकार पदवीधरांची सख्या सिलोनमध्ये चौदा हजारपर्यंत गली आहे. सरकार त्याना नोकऱ्या देऊ शकत नाही किंवा कारखानेही रोजगार देऊ शकत नाहीत.

## डाव्या आघाडीचा जाहीरनामा

समाजवादाचे उद्दिष्ट गाठण्यास योग्य अशी घटना देशास देणे हा डाव्या आघाडीच्या कार्यक्रमातील एक महत्त्वाचा भाग आहे. सध्याचे प्रतिनिधिगृहच घटना समिती म्हणून काम करील. त्यात दोन तृतीयाशापेक्षा अधिक बहुमत डाव्या आघाडीमागे असल्याने घटना मजूर होण्यास अडचण येणार नाही. सिलोन स्वतंत्र सार्वभौम प्रजासत्ताक असल्याचे घोषत करण्यात येईल. सध्याच्या नोकरशाही पद्धतीच्या कारभारात अकार्यक्षमता आणि ढिलाई आलेली आहे. हे दोष दूर करण्यासाठी लोकनियुक्त नोकर मडळे, सरकारी कचेऱ्यात सल्लागार समित्या व प्रादेशिक पायावर जनता समित्या स्थापण्यात येतील. सरकारी उद्योगधंद्याचे क्षेत्र सरकार वाढवील. आयात–निर्यात व आवश्यक वस्तूचा घाऊक व्यापार सरकार आपल्याकडे घेईल. बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात येईल. भूमिहीन शेतकऱ्यांना जमिनी देणे, शेतीचे उत्पादन वाढविण्यासाठी अल्प दराने कर्ज देणे हा कार्यक्रम सरकार हाती घेईल, असे आश्वासन डाव्या आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे.

परराष्ट्र धोरणात सरकार खऱ्या अर्थाने स्वतत्र धोरण अवलंबील. पूर्व जर्मनी, उत्तर कोरिया, उत्तर व्हिएटनाम आणि दक्षिण व्हिएटनाममधील हगामी क्रातिकारक सरकारला म्हणजेच व्हिएटकाँग सरकारला आम्ही मान्यता देऊ अशी भूमिका डाव्या आघाडीचे जाहीरनाम्यात माडली आहे. सुरक्षा समितीच्या ठरावाची अमलबजावणी करून इस्राइल अरबाच्या बळकावलेल्या प्रदेशातून आपल्या फौजा काढून घेत नाही किंवा अरब राष्ट्राना मान्य अशी तडजोड करीत नाही तोपर्यंत त्याच्याशी राजकीय सबध स्थगित ठेवण्यात यावे, असे इस्राइलबाबत डाव्या आघाडीचे धोरण आहे.

नव्या सरकारचे यश आघाडीची एकजूट टिकण्यावर अवलबून राहील. आघाडीचा फायदा घेऊन इतर घटकपक्षात फूट पाडावयाची व आपले सामर्थ्य वाढवाव

### सिलोनमधील बदलते पक्षबळ

| | १९६० | १९६५ | १९७० |
|---|---|---|---|
| श्री लका फ्रीडम पार्टी | ७५ | ४१ | ९० |
| लंका समसमाज पक्ष | १२ | १० | १९ |
| कम्युनिस्ट | ४ | ४ | ६ |
| युनायटेड नॅशनल पार्टी | ३० | ६६ | १७ |
| तामिळ काँग्रेस | २ | ३ | ३ |
| फेडरल पार्टी | – | १४ | १३ |
| अपक्ष | – | ६ | २ |

याचे हे तंत्र कम्युनिस्टांनी अवलंबले तर आघाडी टिकणे कठीण जाईल; पण मत-भेदाच्या प्रश्नावर आघाडीतील सर्व घटक पक्षांनी एकत्र येऊन बहुमताने घेतलेले निर्णय मान्य करावयाचे असे धोरण अवलबले गेले तर आघाडी यशस्वी होईल. भारतात संयुक्त आघाड्यांच्या अपयशामुळे एक प्रकारचे वैफल्य निर्माण झाले आहे. अशा परिस्थितीत सिलोनमध्ये डाव्या आघाडीचा प्रयोग यशस्वी झाला तर त्यामुळे भारतातील संयुक्त आघाड्यांनाही निकोप वळण मिळण्यास त्यामुळे मदत होईल. पण असे न होता एवढे प्रचंड बहुमत मिळवूनही सिलोनमधील डावी आघाडी पूर्वीच्या चुकांमुळेच पुन: मोडली तर इतिहासापासून कम्युनिस्ट व डावे पक्ष काहीच शिकले नाहीत असेच म्हणावे लागेल.

भारताच्या दृष्टीने एक महत्त्वाचा प्रश्न म्हणजे सिलोनमधील भारतीयांचा. याबाबत सिरिमाओ-शास्त्री करार पूर्णपणे अमलात आणण्याचे आश्वासन डाव्या आघाडीने आपल्या जाहीरनाम्यात दिले आहे. सेनानायके सरकारने या कराराची अंमलबजावणी नीट केली नाही अशी त्या सरकारवर आघाडीच्या नेत्यांची टीका होती. हा करार पूर्णपणे अंमलात आल्यास सिलोन-भारत संबध अधिक सुधारतील.

सिलोनमध्ये डाव्याचा विजय झाल्याने तेथील राजकारणावर चीनचा प्रभाव वाढेल काय असाही प्रश्न उपस्थित करण्यात येत आहे. या सबधात एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे अधिकारारूढ डाव्या आघाडीत पेकिंगवादी कम्युनिस्ट मताचा एकही पक्ष नाही. पेकिंगवादी कम्युनिस्टानी निवडणुकीवर बहिष्काराचा आदेश दिला होता, पण हा बहिष्कार पूर्णपणे बारगळला, व पेकिंगवादी कम्युनिस्टांचा सिलोनच्या राजकारणात काहीही प्रभाव नाही हे स्पष्ट झाले. डाव्या आघाडीच्या विजयाबद्दल रशिया व इतर कम्युनिस्ट राष्ट्रानी आनंद व्यक्त केला पण कम्युनिस्ट चीनने कोणतही प्रतिक्रिया व्यक्त केलेली नाही हेही या सदर्भात लक्षात घेतले पाहिजे. सिलोनच्या रबराचे बदल्यात चीनचा तांदूळ घेण्याचा व्यापारी करार मात्र पुढेही चालू राहील. पण चीनशी हे सबध व्यापारापुरतेच मर्यादित राहतील.

सिलोनच्या निवडणुकातील एक महत्त्वाचे वैशिष्टय म्हणजे मतदानाच्या हक्का-बद्दल जनतेने दाखविलेली जागरूकता. स्वातंत्र्यानतर सिलोनमध्ये सात निवडणुका झाल्या पण मतदान कधीही ८० टक्क्यापेक्षा कमी झाले नाही. १९६५ च्या निवड-णुकात ते ८२ टक्के व यावेळी ८५ टक्के झाले. ब्रिटन-अमेरिकेसारख्या पुढारलेल्या लोकशाही देशातसुद्धा एवढ्या मोठ्या सख्येने मतदान होत नाही. जेथील जनता आपल्या लोकशाही हक्काबद्दल एवढी जागरूक आहे तेथे हुकूमशाहीला थारा मिळणार नाही.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

लोकप्रिय ग्रंथाची संस्कारित, सचित्र दुसरी आवृत्ती

# नाझी भस्मासुराचा उदयास्त


रा. म. शास्त्री

किंमत : प्रसिद्धीनंतर रुपये पंचवीस सुमारे
प्रसिद्धीपूर्व सवलतीची किंमत रुपये चौदा

सवलतीची मुदत : १५ ऑगस्ट १९७० पर्यंत
रजिस्टर पोस्टाने ग्रंथ हवा असल्यास रुपये दोन अधिक.
रक्कम मनिऑर्डरने पाठवावी. कार्यालयातही स्वीकारली जाईल.

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M-H 64



“ माझा थोरला मुलगा दोन वर्षांपूर्वी इंजिनियर झालाय् न् धाकटयाला ह्या वर्षी मेडिकलला अॅडमिशन मिळवून दिलीय्. तुमची मुलं काय करतात ? ... ”